म. ग्रं. सं. ठाणें

सन ८-७२

लेखक विष्णु परशराम रानडे

पुस्तकाचें नांव जॉर्ज वाशिंगटन चरित्र

संग्रहालय क्रमांक

५

चरित्र

म. ग्रं. सं. ठाणें
विषय चरित्र
सं. नं. ८८५.

# Dakshiṇá Prize Book Series.

## No. 4.

---

# LIFE OF GEORGE WASHINGTON,

FROM CHAMBER'S MISCELLANY,

TRANSLATED BY THE LATE

VISHṆU PARASHURÁM RÁNAḌE.

REVISED BY

VISHṆU PARASHURÁM SHÁSTRÍ PAṆḌIT.

**PRINTED AND PUBLISHED,**

WITH THE PERMISSION OF

**THE DIRECTOR OF PUBLIC INSTRUCTION AND THE PRESIDENT OF THE DAKSHIṆÁ PRIZE COMMITTEE,**

BY

THE PROPRIETORS OF THE "INDU-PRAKASH" PRESS.

Bombay:

1872.

---

*(Registered under Act XXV of* 1867.*)*

*Price Annas Six.*

Yeshwant Damodhar Bhatt

नं. १०८

दक्षिणा प्रैज कमितीनें बक्षिसें दिलेल्या
ग्रंथांची माला.

नंबर ४.

---

# जार्ज वाशिंगतन

याचा इतिहास.

हा ग्रंथ

"चेंबरस् मिसलनी" यां ग्रंथाच्या आधारानें

## विष्णु परशराम रानडे

यांनीं केला.

(पुणें, इसवी १८५२.—शके १७७४.)

तो

मे. दैरेक्तर आफ् पब्लिक इन्स्त्रक्शन व मे. दक्षिणा
प्रैज कमितीचे अध्यक्ष यांच्या आज्ञेवरून

विष्णु परशुराम शास्त्री पंडित

यांनीं तपासला व

मुंबईंत

इंदुप्रकाशाच्या मालकांनीं आपल्या छापखान्यांत
छापून प्रसिद्ध केला.

---

इसवी सन १८७२.—शके १७९३.

---

(हा ग्रंथ १८६७ च्या २५ व्या आक्ताप्रमाणें नोंदला आहे.)

किंमत ६ आणे.

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं०
ठाणें सन १८०

# प्रस्तावना.

विद्याचार व कलाकौशल्य यांच्या संपन्नतेविषयीं व स्वदेशीय राजकीय सत्तेविषयीं प्राचीन काळीं उत्तम स्थितींत असलेला आणि आज शेकडो वर्षें अधमस्थितीस पावून राहिलेला जो हा हिंदुस्थान देश त्याच्या उद्धारार्थ सर्व प्रकारांनीं यत्न करणें हें प्रत्येक हिंदुमनुष्याचें कर्तव्य कर्मच आहे. या उद्धाराचे मार्ग बहुत आहेत. कोणत्याही देशांत स्वराज्य नष्ट झालें आणि विद्या, ज्ञान, कलाकौशल्य व सदाचरण हीं उत्तरोत्तर क्षीण होत चाललीं अथवा लयास गेलीं ह्मणजे तेथील लोकांच्या दैन्यास व दुर्दशेस पारावार नाहींसा होतो. त्यांचीं शरीरें व मनें अगदीं निःसत्व होतात. तेथील मनुष्यास आपण ह्मणजे "कःपदार्थ" असें वाटूं लागतें. कोणतीही मोठी धाडसाची अथवा दीर्घ प्रयत्नाची गोष्ट करण्यास मन उत्साह धरीत नाहीं. स्वदेशाच्या हितार्थ कोणतीही एखादी लहानमोठी गोष्ट करण्याचें कदाचित कोणीं एखाद्यानें मनांत आणल्यास परकीय राजांच्या मनांत ही गोष्ट आपल्या राज्यास अथवा सत्तेस नाशक आहे कीं काय, आपल्या देशाच्या अथवा लोकांच्या हितास बाधक आहे कीं काय, असा एकदम संशय येतो. आणि तशा संशयास यत्किंचित् जर छायारूपानें

कांहीं आधारसा भासला तर त्या गोष्टीस ते परदेशीय
राजे मदत देत नाहींत इतकेंच नाहीं. तर, तीस
प्रतिबंधही करितात. असें झालें असतां लोक
सहजच निरुत्साह व मेषपात्र असे होऊन पडतात.
जिकडे तिकडे "आमची आतां सद्दीच नाहीं, तेव्हां
आमच्या हातून कांहीं एक व्हावयाचें नाहीं," असाच
ध्वनि कानीं पडतो, आणि सर्व लोक सर्वथा निरुत्साह
होत्साते अगदीं स्तब्ध होऊन बसतात. असें झालें
असतां ते आपल्या संसाराविषयीं व चरितार्थाविषयीं
अगदीं पराधीन होतात. अशा निकृष्ट दशेस पाव-
लेल्या देशाच्या व त्यांतल्या लोकांच्या उद्धाराचा
मुख्य उपाय ह्मटला ह्मणजे त्यांच्यामध्यें अनेक प्रकार-
च्या विद्यांची वृद्धि करणें हा होय. तर तो आमच्या
कृपाळू इंग्लिश सरकारानें चालविला आहे याबद्दल
आह्मी त्याचे अत्यंत उपकारी आहों. तशीच त्या
लोकांमध्यें कलाकौशल्याचीही वृद्धि केली पाहिजे.
तर तिकडेही या शाहण्या व परोपकारी सरकारचें
लक्ष जाण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं आहेत. तिसरी
गोष्ट निरनिराळ्या देशाचे इतिहास व पराक्रमी पुरुषां-
चीं चरित्रें यांचाही त्या लोकांत प्रसार झाला पाहि-
जे, तर तोही आमचें प्रस्तुतचें सरकार करीत आहे.
अशा समयास सर्व पृथ्वीवर अत्यंत विख्यात जो उत्त-
रअमेरिकाखंडातील जार्ज वाशिंग्तन नांवाचा अद्वि-
तीय पुरुष, जो अगदीं सामान्य प्रतीच्या कुळांत जन्मून
अत्यंत उच्च पदास पावला आणि ज्यानें आपल्या
विलक्षण बुद्धिचातुर्यानें, अलौकिक शौर्यानें, परमावधी-

च्या निस्पृहतेनें व स्वभावसिद्ध देशाभिमानानें आपला देश परराष्ट्राच्या अमलांतून स्वतंत्र करून आपलें नांव या भूमंडळावर अमर केलें त्याचें चरित्र लोकांस समजणें किती उपयुक्त आहे हें लिहून कळवितां पुरवत नाहीं. तर स्वदेशहितेच्छु लोकांनीं स्वतः वाचूनच त्याचा अनुभव घेतला पाहिजे.

इंग्लिश भाषेमध्यें जार्ज वाशिंग्‌टनाचें चरित्र शेकडो विद्वानांनीं लिहिलें आहे. कोणी अत्यंत संक्षेपानें लिहिलें आहे, कोणी मोठ्या विस्तारानें लिहिलें आहे. या महापराक्रमी पुरुषाचें अत्युत्तम चरित्र ह्मणजे कांहीं अंशीं उत्तर अमेरिकेचा इतिहासच होय. तर असें तें चरित्र आपल्या लोकांत प्रसिद्ध करावें असा हेतु कैलांसवासी* रा. बा. विष्णु परशुराम रानडे यांच्या मनांत वीस वर्षांपूर्वीं उद्भवून त्यांनीं त्याचा मराठींत तर्जुमा केला. व तो पुस्तकें प्रसिद्ध करणाऱ्या "दाक्षिणा प्रेज कमिती" नांवाच्या मंडळीस नजर केला. तिनें तो पसंत करून रानडे यांस योग्य बक्षिस दिलें. परंतु तो ग्रंथ उत्तम असतां आजवर छापून प्रसिद्ध झाला नाहीं. हें भाषांतर केलें त्यावेळीं रा. बा. विष्णु परशुराम रानडे यांचें वय २१ वर्षांचें होतें. त्यांस देशाभिमानी पुरुषांचीं चरित्रें वाचण्याचा नाद फार होता. त्यांतही त्यांस जार्ज-वाशिंग्‌टनाचें चरित्र हें तर अत्यंत प्रिय होतें. पालिंगकृत वाशिंग्‌टनाच्या चरित्राचीं तर त्या पुरुषानें जशीं कांहीं पारायणेंच केलीं. इंग्लिशभाषा त्यांस

---

* हे ता. ८ आगष्ट १८७१ रोजीं लोकांतरास गेले.

अत्युत्तम लिहितां येऊं लागली त्याविषयीं पुष्कळ अंशीं याच चरित्राचें वाचन साधन झालें असें ह्मणण्यास चिंता नाहीं. या चरित्राच्या वाचनापासून त्यांस इंग्लिशभाषा उत्तम लिहितां येऊं लागली होती इतकेंच नाहीं. तर त्यांचें मन स्वदेशाभिमानानें भरून गेलें होतें, त्यामुळें ते स्वशक्त्यनुसार स्वदेशप्रीत्यर्थ शरीरानें, मनानें, वाणीनें व द्रव्यानें बहुत झटले. हा ग्रंथ लिहिल्यानंतर जीं त्यांचीं वीस वर्षें या लोकीं गेलीं तीं नेहमी थोडें बहुत तरी स्वदेशप्रीत्यर्थ झटण्यांत गेलीं. त्यांत अखेरीस अनाथ विधवांच्या मुक्ततेकरितां त्यांनीं जी एकवेळ घट्ट कंबर बांधिली ती त्यांनीं आई, बंधु, आप्त, इष्टमित्र, सोयरेधायरे वगैरेनीं ती सोडण्याविषयीं पाहिजे तितका आग्रह केला तरी नाहींच सोडिली. त्याकरितां कितीही हाल सोसावे लागले तरी सोसण्याचा त्या पुरुषाचा पूर्ण निश्चय होता. अशा दृढनिश्चयाचा आह्मांमध्यें एक जरी पुरुष निर्माण होण्यास हें लहानसें उत्तम चरित्र यत्किंचित् अंशीं साधक झालें तरी हा लेख लिहिणारास परमानंद होईल.

वि. प. शा. पं.

मुंबई, ता. १ मार्च १८७२ इ.

स्थळप्रत
म. ग्रं. सं. ठाणे.
... ग्रंथ संग्रहालय ... नं. ७०८८ ... ता. ... ठाणे.

# जार्ज वाशिंग्तन

(हा विख्यात पुरुष अमेरिकेंत होऊन गेला)

याची खबर.

—•—

वर्जिनिया ह्मणून "युनैतेद स्तेत्स" या देशांत एक प्रांत आहे. त्यांत इसवी १७३२ त फेब्रुवारी महिन्याच्या २२ व्या तारखेस जार्ज वाशिंगूतन हा जन्मला. हा अगस्तिन वाशिंगूतन याच्या दुसऱ्या बायकोचा वडील मुलगा होता. अगस्तिन वाशिंगूतनाची मालमत्ता मोठी होती. इग्लंददेशांत आलिवर क्रामुवेल राज्य करीत असतां जान वाशिंगूतन ह्मणून एक इंग्रज स्वदेश सोडून अमेरिकेंत जाऊन राहिला होता, त्याचे हे वंशज होते. वाशिंगूतनाच्या आईचें नांव मेरि बेल असें होतें. हिचा नवरा ह्मणजे जार्ज वाशिंगूतन याचा बाप हा इसवी सन १७४३ त अकस्मात् मृत्यु पावला. यामुळें आपल्या पांच मुलांस व आपल्या सवतीच्या दोन मुलांस विद्या वगैरे शिकविणें हें मेरि बेल हिजवरच पडलें. बाप मृत्यु पावला त्यावेळेस जार्ज वाशिंगूतन हा सारा दहा अकरा वर्षांचा होता.

अगस्तिन वाशिंगूतन हा जरी तारुण्यावस्थेंतच मरण पावला, तथापि त्यानें आपल्यामागें आपल्या मुलांची

कोणत्याही प्रकारें दधात टेविली नव्हती. लारेन्स म्हणून जो त्याचा वडील मुलगा होता, त्यास त्यानें ५०० एकर जमीन व वर्जिनिया प्रांतांत मेरि लांद येथें लोखंडाचे कारखाने होते, त्यांत त्याचा भाग होता तो हीं दिलीं. दुसऱ्या मुलास त्यानें आपली वेस्तमोरलांद येथील मालमत्ता दिली. हा स्ताफर्द प्रांतांत मृत्यु पावला तेथील घर, जमिनी वगैरे जी याची मालमत्ता होती ती यानें जार्ज यास दिली व तीन लहान मुलगे होते त्यांपैकीं प्रत्येकास सातशें एकर जमीन दिली. याखेरीज यानें आपल्या मुलींचीही तजवीज केली. अगास्तिन वाशिंग्तन यानें आपल्या मृत्युपत्रांत असें लिहून टेविलें होतें कीं, माझीं जीं पांच मुलें लहान आहेत तीं वयांत येत तोंपर्यंत त्यांच्या मालमत्तेची वहिवाट माझ्या बायकोनें करावी. मेरि वेल ही फार शाहणी होती. तिच्या नवऱ्यानें तिजकडे जें काम सोंपविलें होतें तें तिनें यथास्थित केलें. ती बहुत दिवस वांचली आणि तिचा वडील मुलगा जार्ज वाशिंग्तन याचा जो पुढें उत्कर्ष झाला तो तिनें पाहिला.

मुलांच्या विद्याभ्यासाची सोय या कालीं अमेरिका खंडांत बरोबर नव्हती. श्रीमंत लोकांच्या मनांत आपल्या मुलांस चांगली विद्या शिकविण्याचें आलें तर त्यांस तीं मुलें इंग्लंद देशांत पाठवावीं लागत असत. परंतु बहुत करून सर्व लोक जवळपास ज्या शाळा होत्या त्यांतच आपलीं मुलें पाठवून तेथें जी काय विद्या होई तींतच संतोष मानून राहत असत. कधीं कधीं एखादा विद्वान् मनुष्य शाळा घाली; परंतु बहुतकरून

सर्व पंतोजींत कोणी लिहिणें, वाचणें व जमाखर्च यांखेरीज दुसरें कांहीं मी शिकवीन असें ह्मणणारा नसे. जार्ज वाशिंगृतन यानें जी काय विद्या संपादली ती याचप्रकारच्या पंतोजींच्या हाताखालीं संपादली; आणि सोळावर्षांचा होण्यापूर्वींच त्यानें शाळाही सोडिली असें दिसतें. त्याच्या लहानपणाविषयीं जी काय माहिती आहे तिजवरून असें दिसतें कीं, हा चांगल्या गोष्टी सांगितल्या असतां त्या घेणारा व सरळ स्वभावाचा असा होता. लहानपणापासूनच याच्या वजनदारीविषयीं व याच्या सोबत्यांत याचा चहा असल्याविषयीं असें ह्मटलें आहे कीं, याच्या शाळेंतील सोबती आपले कज्जे निवडावयास याजकडे नेहमी आणीत असत. पोरपणाच्या खेळांपैकीं उड्या मारणें, कुस्ती करणें, पोहणें इत्यादि खेळ यास फारच आवडत असत. आपल्या शाळेंतील सोबत्यांच्या टोळ्या करून त्यांजकडून शिपाई लोकांप्रमाणें कवाईत करवावी, त्यांस किल्ल्यावर हल्ला कसा करावा हें शिकवावें, व त्यांच्या कडून लटुपुटीच्या लढाया करवाव्या ह्या गोष्टींमध्यें त्यास फार आनंद वाटे, येणें करून त्याची युद्धाची आवड लहानपणींच प्रगट झाली. वाशिंगृतनाचे लहानपणचे खरडे व लेख अद्यापि जतन केलेले आहेत त्यांवरून याच्या लहानपणच्या स्वभावाचें व उद्योगाचें आपणास चांगलें ज्ञान होतें. ते सर्व नीट जपून शिस्तवारीनें लिहिलेले आहेत. बहुतकरून त्या सर्व लेखांत अंकगणित, कर्त्तव्यभूमिति आणि जमीन-

मोजणी यांचीं उदाहरणें सोडवलेलीं आहेत. आणि त्यानें भूमितींतील उदाहरणांची सिद्धता करण्याकरितां ज्या आकृति काढिल्या आहेत, त्या फार सुंदर व बरोबर आहेत. याच्या लहानपणच्या लेखांपैकीं एक लेख चतुष्पत्री वहीवर आहे, त्यास त्यानें लेखनपद्धाति असें नांव दिलें आहे. त्यांत हुंड्या, पावत्या, गहाणखतें, खरेदीखतें, जमीनपत्रकें, मक्तेपत्रकें, सनदा, मृत्युपत्रें इ० हीं कशीं लिहावीं त्यांचे माने व ध्यानांत धरण्याजोगे शब्द, कारकुनाप्रमाणें लहान मोठ्या अक्षरांनीं लिहून, ठेविले आहेत. ही लेखनपद्धाति संपल्यावर पुढें इतर पद्यात्मक ग्रंथांतील निवडक निवडक पद्यें लिहून ठेविलीं आहेत. वाशिंग्तनाचें चरित्र लिहिणारे असें सांगतात कीं, या पद्यांची रचना फार चांगली होती असें नाहीं; पण त्यांतील विचार फारच प्रौढ होते. या पद्यांपुढें सभ्यपणाचे व लोकांशीं बोलण्याचालण्याचे नियम लिहिलेले आहेत. या प्रकारचे सुमारें ११० नियम आहेत. हे नियम त्यानें एकाच पुस्तकांतून काढून घेतले असावे किंवा अनेक पुस्तकांतून मिळवलेले असावे. हे नियम कसे काय होते, हें आमच्या वाचणाऱ्यांस कळण्याकरितां, त्यांपैकीं कांहीं आह्मी येथें लिहितोंः—

या नियमांतील दुसरा नियम असा आहे कीं, "दुसऱ्या मनुष्यापुढें आपणच आपणाशीं गुंगत जाऊं नये, हातानें किंवा पायानें वाजवीत जाऊं नये." बाराव्या नियमांत असें सांगितलें आहे कीं, "उद्योगी मनुष्याशीं थोडें बोलून आपला अभिप्राय त्यास समजून द्यावा".

एकुणतिसाव्या नियमांत असें सांगितलें आहे कीं, "सभ्य व विद्वान् अशा लोकांत बसलें असतां नीचपणाचें किंवा हलकेपणाचें भाषण करूं नये; व अज्ञानी लोकांत बसलें असतां त्यांस मोठमोठे प्रश्न करूं नयेत; व मोठ्या गहन विषयावर व ज्या गोष्टी त्यांस अविश्वसनीय वाटतील तशा गोष्टींवर संभाषण करूं नये". चाळिसाव्या नियमांत असें लिहिलें आहे कीं, विचार केल्यावांचून बोलूं नये, स्पष्ट बोलावें, फार त्वरेनें शब्दोच्चार करूं नये, जपून शब्दांचा स्पष्ट उच्चार करीत जावा. परमेश्वरानें तुमच्या मनांत जो सदसद्विचाररूप दीप लावून ठेविला आहे त्यास सर्वकाल प्रज्वलित राखण्याविषयीं झटत जा."

त्याच्या लहानपणींच्या लेखामध्यें जो बेतबात व जी व्यवस्था नजरेस येतात तोच बेतबात व तीच व्यवस्था हीं त्याच्या सर्व कामांत आमरणांत दिसून येतात. वाशिंग्तनास लहानपणीं व्याकरण शिकाविलें नव्हतें, यामुळें त्यानें लहानपणीं जीं पत्रें लिहिलीं आहेत त्यांत व्याकरणाचे व भाषणपद्धतीचे कांहीं दोष आढळतात. पुढें हा जी बिनचूक व प्रांजल भाषा लिहूं लागला, तिचें संपादन त्यानें लिहिण्याचा व बोलण्याचा अभ्यास करून केलें. मोठा झाल्यावर वाशिंग्तन फ्रेंचभाषा शिकूं लागला; पण त्या भाषेंत तो फारसा निपुण झाला नाहीं. त्यास ती भाषा सरासरी लिहितां व बोलतां येत होती. वाशिंग्तन १४ वर्षांचा झाला तेव्हांच कोणी कांहीं हुद्याचें काम त्यास सांगितलें होतें व त्यानेंही त्यास रुकार दिला

होता. पण त्यानें तें पत्करलें असतें तर त्याच्या हातून जीं महत्कृत्यें घडावीं ह्मणून ईश्वरी संकेत होता तीं घडलीं नसतीं. तें काम असें कीं, त्याचीं अचाट कृत्यें करण्याची व धांवाधांवीची आवड पाहून त्याचा सावत्र भाऊ लारेन्स ह्मणून होता त्यानें आपली भीड खर्चून त्यास इंग्रजसरकारचे आरमारांत "मिद शिपमान" ह्मणून एक अधिकार आहे तो देण्याची तजवीज करविली. त्या अधिकाराची सनद येऊन पोहोंचल्यानंतर वाशिंगृतनास या कामांत आपली योग्यता मोठी वाढेल असें वाटून मोठा आनंद झाला. कारण ज्या स्थितींत वाशिंगृतन होता त्या स्थितींतिल मनुष्यास ही जागा मिळणें ह्मटलें ह्मणजे मोठी भाग्याचीच गोष्ट होती. परंतु त्याच्या आईनें या कामास फार मोडा घातल्यामुळें त्यानें तो बेत सोडला आणि तो पहिल्याप्रमाणें शाळेंत अभ्यास करीत राहिला. त्यामुळें ती जागा दुसऱ्या एका मुलास मिळाली.

वाशिंगृतन सोळा वर्षांच्या वयाचा झाला तेव्हां त्यानें शाळा सोडली. त्यानंतर त्याचा भाऊ लारेन्स याची मौंत वर्नन ह्मणून शेतवाडी होती तेथें तो कांहीं दिवसपर्यंत जाऊन राहिला. या वाडीस हें नांव, लारेन्स याचा कोणी जनरल वर्नन ह्मणून मित्र होता त्याच्या नांवावरून पडलें होतें.

लारेन्स यानें मिस फेअर फाक्स हिशीं लग्न केलें होतें. ही लारेन्स याचा जवळचा संबंधी विलियम फेअर फाक्स ह्मणून होता त्याची मुलगी होती. विलियम फेअर फाक्स हा मोठा संपत्तिमान होता

व त्याजकडे वर्जिनिया प्रांताच्या वसाहतींतील कांहीं सरकारी काम होतें. विलियम फेअर फाक्स हा लार्द फेअर फाक्स याचा एक दूरचा नातेवाईक होता. वाशिंगृतन हा मौंत वर्नन येथें आपल्या भावापाशीं राहत होता, त्या वेळेस लार्द फेअर फाक्स हा लारेन्स याचा सासरा जो विलियम फेअर फाक्स त्याला भेटावयास आला होता; आणि याच्या घरीं नेहमीच त्याचें येणें जाणें फार होतें. तेथें त्याच्या नजरेस असें आलें कीं, वाशिंगृतनास जमीन मोजणीचें काम फार आवडतें. तो आपल्या भावाचीं शेतें मोजून आपलें मोजणीचें काम तरतरीत वागतें ठेवतो, हें जेव्हां लार्द फेअर फाक्स यानें स्वतः पाहिलें, तेव्हां त्यानें आपलीं शेतें मोजण्याचें काम वाशिंगृतनासच सांगितलें. लार्द फेअर फाक्स याचीं शेतें पोतोमाक व रापाहानक या दोन नद्यांच्या मध्यें होतीं. ही मोजणी करण्याचीं कारणें अनेक होतीं. त्यांत मुख्य हें कीं, कोणास विचारल्या पुसल्या शिवाय नवीन लोक येऊन लार्द फेअर फाक्स याच्या शेतांतील दूरदूरच्या सुपीक जमिनींत वसाहती करूं लागले होते, हें बंद करण्या करितां जमिनीची मोजणी करून बांध वगैरे घालणें अवश्य होतें. हें मोठें जबाबदारीचें काम लार्द फेअर फाक्स यानें वाशिंगृतनावर सोंपिवल्यानंतर तो सन १७४८ च्या मार्च महिन्यांत आलिघनी डोंगराच्या खिंडींतील जमिनीची मोजणी व पाहाणी करण्याकरितां निघाला. त्या वेळेस त्याच्या बरोबर विलियम फेअर

फाक्स याचा मुलगा जार्ज फेअर फाक्स हा होता. वाशिंगूतनास ही पाहाणी करण्यास सुमारें दोन महिने फिरावें लागलें. त्यानें त्यावेळची जी आपली दिनचर्या लिहून ठेविली आहे तिजवरून असें दिसतें कीं, वाशिंगूतनास या कामांत बरेच श्रम पडले असावे. याच्या दिनचर्येच्या पुस्तकांत मार्च महिन्याच्या १५ वे तारिखेचें काम येणेंप्रमाणें लिहिलें आहे:—

"संध्याकाळपर्यंत बहुत श्रम करून घरीं गेलों आणि फराळ झाल्यानंतर निजावयास गेलों. माझ्या बराबर जे दुसरे लोक होते त्यांस त्या रानांत कसें राहावें हें ठाऊक होतें. पण मला ठाऊक नव्हतें त्यामुळें मी आपले सर्व कपडे अंगावरून वेतानें काढून निजावयास गेलों, तों तेथें बिछाना वगैरे कांहीं नव्हतें. तेथें एक हातरी पसरलेली होती व तिजवर एक भरभरीत घोंगडी पलंगपोसाऐवजीं घातलेली होती. तीही उवापिसानीं भरलेली होती. हें पाहून मला मोठें आश्चर्य वाटलें. मग मी तेथून उठून गेलों आणि आपल्या सोबत्यांप्रमाणें अंगावर कपडे घालून मोठ्या आनंदानें निजलों."

सुमारें तीन वर्षांपर्यंत वाशिंगूतनानें मोजणीचें काम वर्नन प्रांताच्या आसपास केलें. कधीं कधीं तो आलिघनी डोंगरापर्यंतही त्या कामाच्या संबंधानें जाई. वाशिंगूतनास मोजणीची सनद मिळाली होती त्यामुळें त्याची मोजणी सर्व कबूल करीत. त्यावेळीं वर्नन येथें मोजणीदार फार नव्हते ह्मणून त्याकडे पुष्कळ काम

येऊन त्यास पैसा बहुत मिळे. अमेरिकेचे पश्चिम भागीं मोजणी करतांना त्यास पावसापाण्यांत फिरावें लागे व त्यास श्रमही बहुत पडत. याविषयीं त्यानें आपल्या एका मित्रास पत्र लिहिलें आहे त्यांत तो असें लिहितो कीं, "पैसा मिळतो ह्मणूनच मी हे इतके श्रम करतों. मोजणीस जाण्या जोगी ज्या दिवशीं हवा असेल त्यादिवशीं मला दोन "पिस्तॅल"* मिळतात व कधीं कधीं सहाही मिळतात." त्याच वेळेस त्यानें आपल्या दुसऱ्या एका मित्रास पत्र लिहिलें आहे. त्यांत तो असें लिहितो कीं, "हे माझे परमप्रिय मित्रा, मी लार्ड फेअर फाक्स याच्या घरीं आहें. आज जर माझें अंतःकरण शांत असतें, तर माझा काल येथें आनंदानें गेला असता. येथें कर्नल जार्ज फेअर फाक्स याची मेहुणी आहे, ती बोलून चालून फार चांगली आहे. हिची माझी वारंवार गांठ पडते, यामुळें माझ्या मनांत कामोद्भव होतो व तेणेंकरून "लोलंदांतील सुंदर स्त्रियांचें मला स्मरण होऊन माझ्या मनास फार दुःख होतें." अशा गुह्यगुह्य गोष्टी वाशिंगृतनानें या पत्रांत लिहिल्या होत्या, यावरून ज्यास त्यानें हें पत्र लिहिलें होतें तो याचा मोठा जिवलग मित्र होता असें दिसतें. कामोद्भवाच्या योगानें यास जें दुःख होत होतें, त्याविषयीं त्यानें त्यासमयीं बहुत पत्रें लिहिलीं आहेत; पण वाशिंगृतनाचें मन पहिल्यानें जिच्यावर बसलें होतें व जिच्या स्मरणानें यास दुःख होत होतें

---

* पिस्तल ह्मणून एक नाणें होतें त्याची किंमत साडेआठ रुपये होती.

[library stamp]

अशी जी लोलंदांतील सुंदर स्त्री तिचें नांव या पत्रांत कोठें आढळत नाहीं.

इ० सन् १७५१ वर्षाच्या सुमारास वर्जिनिया प्रांतांत इंग्रजलोकांच्या ज्या वसाहती होत्या त्यांस फ्रेंच व इंदियन लोक फार त्रास देऊं लागले. फ्रेंच लोकांनीं आपल्या राज्याच्या शेजारीं वसाहतींतलि लोकांच्या राज्याचे जे प्रदेश होते ते बळकावण्याचा प्रारंभ केला व इंदियन लोकांनीं लुटालूट करण्याचें आरंभलें. त्या लोकांपासून आपलें संरक्षण करावें ह्मणून इंग्रज लोक फ्रेंच लोकांशीं लवकरच लढाई करतील असा समय दिसत होता. तेव्हां इग्रज लोकांची कुमक करावी ह्मणून वसाहतींतील लोकांनीं सैन्य जमा करून निरनिराळ्या परगण्यांतील सैन्यावर एक एक अधिकारी नेमण्याचा उद्योग आरंभिला. त्यावेळेस वाशिंगृतनही एका सैन्याचा अधिकारी नेमला गेला. त्यास काम देण्याविषयीं त्याचे मित्र फेअर फाक्स यांनीं भीड खरचली. त्यावेळेस वाशिंगृतनाचें वय वीस वर्षांचें होतें. त्या कामांत त्यास वर्षास दीडशें पौंद ह्मणजे १,५०० रु० मिळकत होती. या गोष्टीपासून त्यास पलटणीकडील कामाची माहिती झाली. तें काम तो मोठ्या तत्परतेनें करीत असे. ज्या गोष्टी त्यास कळत नसत त्या, कामांत जे निपुण होते त्यांस तो विचारीत असे व संग्रामकौशल्याविषयीं मोठालीं पुस्तकें जवळ बाळगीत असे.

वाशिंगृतनास चाकरी मिळाल्यानंतर लवकरच त्याचा भाऊ लारेन्स हा फार अशक्त झाला. त्यास

ता.

बरबेदोस येथें हवा पालटण्यास जावयास त्यानें सांगितलें व आपणही त्याच्या बरोबर गेला. त्याच्या भावास तेथें गेल्यानेंही कांहीं आराम पडला नाहीं, ह्मणून तो बरमुदा येथें जावयास निघाला, व त्यानें वाशिंगूतनास वर्जिनिया येथें जावयास सांगितलें. लारेन्सयाच्या मनांत बरमुदा येथें गेल्यावर तेथें आपली बायको न्यावयाची होती. परंतु ती गोष्ट घडून आली नाहीं. बरमुदा येथें गेला तरी त्यास चैन पडेना, व प्रकृति पहिल्यापेक्षां जास्त बिघडली, ह्मणून तो पुनः वर्जिनिया येथें गेला. आणि तारीख २६ माहे जुलई सन १७५२ रोजीं मौंत वर्तन येथें मरण पारला. त्यास एक मुलगी मात्र होती. त्यानें आपल्या जिनगीचें वारसपत्र मुलीच्या नांवें करून दिलें. आणि तिच्या मागें तिला मूल नसलें तर ती जिनगी वाशिंगूतनास मिळावी असें लिहून ठेविलें.

बरबेदोस येथून परत आल्यावर वाशिंगूतन पुनः लवकरच आपल्या लश्करी कामावर गेला. मि. दिनविदी यास वर्जिनिया एथें लेफ. गवर्नराची जागा मिळाल्यानंतर त्यानें वसाहतींतील सर्व सैन्याचे चार विभाग केले. त्यांतून उत्तरेकडील सैन्य वाशिंगूतनाच्या तैनातीस दिलें. त्याचें काम निरनिराळ्या परगण्यांत जाऊन सैन्यावरील नाइकांस हुकूम द्यावे, सैन्याकडून कवाइती करवाव्या व त्यांनीं हत्यारें चांगलीं ठेविलीं आहेत किंवा नाहीं हें पाहावें एवढें होतें.

## फ्रेंच लोकांशीं लढाई.

आलेगानी पर्वतापलीकडे जे इंग्रज लोकांचे प्रांत होते त्यांवर फ्रेंच लोक हल्ले करीत होते त्यांविषयीं दररोज कांहीं तरी नवें वर्त्तमान कांनीं पडत असे, तें वर्त्तमान इंग्लंदांत देखील जाऊन पोंचलें. तेव्हां तेथील कामदारांनीं गवर्नर दिनविदी यास हुकूम पाठविला कीं, ओहिओ नदीवर दोन किल्ले बांधावे. जे लोक हल्ला करितील त्यांस बेलाशक तेथून हांकून द्यावें व इंग्रज सरकारचा हक्क तेथें चालू करावा. तेव्हां गवर्नरानें प्रथम राजाच्या नांवें तिकडे एक कामदार पाठवावा असा निश्चय केला. त्या कामदारानें जाऊन फ्रेंच लोकांचा जो सेनापति त्याशीं भाषण करावें व त्यास इंग्रज लोकांच्या प्रांतांवर हल्ले करण्याचें कारण विचारावें आणि फ्रेंच लोकांचें सैन्य किती आहे याची पक्की बातमी काढावी; ते कोठपर्यंत हल्ला करीत येणार आहेत व त्यांस इंदियन लोकांचें साह्य किती आहे याचीही चौकशी करावी; अशीं कामें त्यास ठरविलीं. त्या कामांवर वाशिंगृतन यास वर्जिनिया प्रांताच्या अदूजुतंत जनरलची जागा व मेजर ही पदवी देऊन नेमिलें त्यावेळेस त्याचें वय २२ बेवीस वर्षांचें होतें. त्याजबरोबर एकंदर सात असामी होते त्यांत दोन दुभाषी होते. एक फ्रेंचांशीं बोलण्याकरितां व दुसरा इंदियनांशीं बोलण्याकरितां. त्यानें भर हिंवाळ्यांत रानटी लोकांच्या जंगलांतून, पांचशें साठ मैलपर्यंत प्रवास केला आणि

ज्या कामास त्याला पाठविलें होतें, तें काम बजावून तो तीन महिन्यानंतर वर्जिनिया प्रांतांतील मुख्य सरकारची जागा विल्यम्सबर्ग येथें परत आला. गवर्नर दिनविदी याचे मुख्य तीन उद्देश होते. ते हे कीं, इंग्रज लोकांस किल्ला बांधण्याकरितां सोईवार जागा कोठें आहे याचा शोध करावा, इंदियन लोकांशीं स्नेह करून फ्रेंच लोकांस त्यांस साह्य न करूं द्यावें व फ्रेंच लोकांच्या किल्ल्यांत जाऊन यावें हीं तिन्ही कामें वाशिंगृतनानें केलीं. तो फ्रेंचांच्या किल्ल्यांत जाऊन सेनापति यास भेटला. परंतु त्या भेटीनें मनांत होतें तें काम झालें नाहीं, ह्मणून तेथील हवी तेवढी बातमी घेऊनच परतला. वाशिंगृतन हा विल्यम्सबर्ग एथें परत आल्यानंतर त्याची ह्या प्रवासांतील दिनचर्या वसाहतींतील व इंग्लंदांतील वर्तमानपत्रांत छापून प्रसिद्ध केली. ती लोकांस फार उपयुक्तशी वाटली. कां कीं, तिजवरून फ्रेंच लोक व इंग्लिश लोक त्यावेळेस परस्पराशीं कोणत्या रीतीनें वागत असत हें कळून येत असे.

त्यानंतर मि. दिनविदी गवर्नर यानें मोठ्या उत्साहानें युद्धाची तयारी चालविली. कायदे करणाऱ्या मंडळींस संकटकाळीं जे उपाय करणें बरोबर वाटतील ते सर्व उपाय त्यांनीं करावे ह्मणून त्यानें त्यांची लवकरच सभा भरविली. इतक्यानें त्याचें समाधान न होऊन त्यानें इतर प्रांतांतील गवर्नरांसही लिहिलें कीं, त्या त्या प्रांतांतल्या लोकांच्या मनांत या गोष्टीबद्दल काळजी उत्पन्न करावी. परंतु वसा-

हतवाल्या लोकांस त्या गवर्नराची ही फारच त्वरा पाहून चांगलेंसें वाटलें नाहीं. ते ह्मणूं लागले कीं, "ज्या लढाईंत आमचा संबंध नाहीं तींत अशी घाई करून आह्मीं काय ह्मणून विनाकारण शिरावें? फ्रेंच लोक आपली हद्द सोडून ओहिओ नदीवर आले त्या विषयीं विचार करण्याची वर्जिनियाच्या गवर्नरास काय गरज आहे. ते आमच्या राज्याच्या हद्दींत येत आहेत, हें तरी खचित आहे काय? ह्या जमिनीवर ग्रेत बितनाच्या राजाचा काय हक्क आहे बरें? जर त्याचा आहे तर फ्रान्सांतील राजाचा तरी काय कमी आहे? जर ग्रेत बितनाच्या राजाचा हक्क आहेच तर त्यानें आपले शिपाई फ्रेंचांस हटवण्याकरितां येथें पाठवावें कीं नाहीं? वसाहत केलेले लोक लढाई करितील ह्मणून त्यानें काय ह्मणून स्वस्थ बसावें? फ्रेंच लोक असले किंवा इंग्लंदचे लोक असले तरी आह्मांस सारखेच. आह्मांस कोणीही दूध देत नाहींत." ते लोक जेव्हां अशा प्रकारच्या कुरकुरी करूं लागले तेव्हां त्या गवर्नरास फारच त्रास आला. पुष्कळच वादविवाद झाल्यावर देशसंरक्षणाकरितां वर्जिनियाप्रांतांतील कायदे करणाऱ्या लोकांनीं सरकारास दहा हजार पौंद, ह्मणजे एक लाख रुपये वर्गणीनें जमा करून दिले. परंतु वर्गणीच्या रीतीचा त्या गवर्नरास फारच राग आला. त्यानें होल्दर्नेस येथील स्वामिभक्त अरल यास असें लिहिलें कीं, "हे वसाहत करणारे लोक स्वतंत्र लोकांप्रमाणें वागतात." तथापि त्यानें शिबंदी फौज जमा

ग्रंथ संग्रहालय ठाणें

केली. कर्नल फ्राय ह्मणून एक इंग्रज होता त्यास मुख्य नेमला आणि वाशिंगतन ह्यास लेफ्तिनंत कर्नल ही पदवी देऊन तो त्याच्या हाताखालीं नेमला. गवर्नर आणि कर्नल फ्राय साहेब हे, जे लोक चाकरीस राहतील त्यांस जमीन देतों असें सांगून लोकांस चाकरीस ठेवीत होते. ह्या कामांत ते गुंतले असतां वाशिंगतनास, जेथें फ्रेंच लोक येऊन पोंहच-णार त्या ठिकाणीं सरहद्दीवर एक ठाणें होतें तेथें शिपा-यांच्या तीन टोळ्या देऊन पाठविलें; त्यावरून लढाईचा नेम झाला ह्मणजे प्रथम अर्थात आह्मांसच तोंड दिलें पाहिजे हें खचित आहे असें वाशिंगतन समजला. ओहिओ येथें ब्रितिशांचा किल्ला होता तो फ्रेंचांनीं घेत-ला व त्यांची एक टोळी आपल्या ठाण्यावर आली, असें ऐकून त्यानें बेत केला कीं, आपण आतां अरण्यांत शिरावें. तसें केल्यानंतर १७५४ त मे महिन्याच्या २७ व्या तारखेस फ्रेंच लोकांचा सरदार जुमन्विल साहेब होता तो पन्नास शिपायांच्या टोळीनिशीं भेट-ला, त्यावेळेस गोळी वाजली. त्या लढाईंत तो सरदार व त्याचे दहा लोक इतके पडले व वीस जण बंदिवान केले. वाशिंगतनाचा सारा एकच शिपाई पडला व दोघां-तिघांस जखमा मात्र झाल्या. लढाई चालू करण्याचा नेम रीतीप्रमाणें ठरला नव्हता, ह्मणून ही लढाईची बातमी ग्रेटब्रितन व फ्रान्स ह्या दोहों देशांत कळतांच तेथें मोठी हाकाहाक झाली आणि लोकांनीं वाशिंगतनास दोष लावला. फ्रान्सदेशांत जुमन्विल ह्याला क्रूरपणानें मारला, असें लोक समजूं लागले. तेथील षाहिरांनीं ह्या

लढाईवर कविताही केल्या, त्यांत वाशिंग्तनाचें चांगलें वर्णन केलें असें दिसत नाहीं. इंग्लंदांतील लोकांसही हें कृत्य चांगलें वाटलें नाहीं, असें पुढील ग्रंथाधारावरून दिसतें. हा ग्रंथ ही गोष्ट झाल्यावर लवकरच हारेस् वाल्पोल ह्यानें केला. या ग्रंथाचें नांव "दुसऱ्या जार्ज राजाचें चरित्र" असें आहे. वाल्पोल ह्मणतो, "मागल्या लढाईंत जो जय झाला त्याविषयीं मेजर वाशिंग्तन साहेबानें इंग्लंदच्या राजास पत्र पाठविलें त्यांत त्यानें शेवटीं असें लिहिलें आहे कीं, 'बंदुकीच्या गोळीचा आवाज ऐकून मला आनंद होतो' नंतर राजानें समयोचित उत्तर असें केलें कीं, जर तो पुष्कळ गोळ्यांचे आवाज ऐकता तर तो असें न लिहिता." वाल्पोल यानें असें लिहिलें आहे कीं, वाशिंग्तन हा ढौली असे. वाशिंग्तनास जेव्हां एका गृहस्थानें विचारलें कीं, वाल्पोल यानें लिहिलें आहे असें तूं कधीं ह्मणाला होतास काय ? त्यावर त्यानें उत्तर दिलें कीं, मी ह्मणालों असलों तर कदाचित् लहानपणीं ह्मणालों असेन.

कर्नल फ्राय साहेब सेनेकडे जात असतां वाटेनें मरण पावला, तेव्हां अर्थात् वाशिंग्तन हाच मुख्य अधिकारी झाला. कां कीं, जरी कर्नल इन्स हा त्या जाग्यावर नेमला होता तरी तो कामावर कधीं हजर झाला नाहीं. सेनेंतील सरदारांचे व शिपायांचे पगार कमी केलें, त्यावेळेस त्या लोकांस राग आला आणि वाशिंग्तनास फारच संकट पडलें. तथापि ह्याच्या सैन्यांत तीनशें लोकांवर शिवबंदी लोक होते व दीडशें लोक इतर होते व त्यांवर कप्तान मकाई साहेब अधिकारी होता,

त्यासर्व सेनेंत वाशिंगूतनानें मोठ्या प्रयत्नानें मोहिमभर बंदोबस्त राखला. फ्रेंच लोकांची सेना किल्ल्यावरून येईल आणि आपला पराजय करील असें त्यास भय पडून तो ग्रेव मेदोज येथें परत गेला. ती जागा वसाहत केलेल्या जाग्याजवळच होती. त्या ठिकाणीं त्याच्या लोकांनीं तोफा व इतर सामान वाहून नेलें त्यामुळें ते अगदीं थकून गेले होते व जवळ शिधासामग्रीही पुष्कळशी नव्हती, ह्मणून त्यानें भोंवताला खंदक खणून नवीन कुमक येई तों पर्यंत तेथें तळ देण्याचा निश्चय केला. नंतर "फोर्त नेसेसिति" ह्मणून एक भुइकोट बांधला. ह्या कोटास एकाएकीं सुमारें नऊशें फ्रेंच लोकांनीं येऊन वेढा घातला. वाशिंगूतनानें गोळी वाजवली, परंतु त्याला कोट सोडून बाहेर जाणें भाग पडलें. त्यानें त्या लोकांपासून अप्रतिष्ठा न होतां उइल्स क्रीक येथें आपणास जाऊं देण्याचें कबूल करून घेतलें. ह्या प्रसंगीं इतक्या युक्तीनें तो वागला कीं, बर्गेस सभेनें त्याची व त्याच्या सैन्याची फार वाहवा केली.

गवर्नर दिनविदी साहेबानें शिवबंदीकडील लोकांचा बंदोबस्त चांगल्या तऱ्हेनें राखावा असा नवीन बेत केला, परंतु ह्या बेतानें जार्ज वाशिंगूतन याची कर्नल ही पदवी जाऊन त्यास सनदी कप्तानांबरोबर चाकरी करण्याचा प्रसंग प्राप्त होणार होता ह्मणून त्यानें चाकरीचा राजीनामा देऊन चाकरी सोडली. पुढें मेरीलांद, एथील शार्पी नामें गवर्नरानें वाशिंगूतन यास चाकरी करण्याचा आग्रह केला त्यावेळेस त्यानें उत्तर दिलें

कीं, जर तुमच्या मनांत मी सनद घेऊन चाकरी करावी–ह्मणजे ज्या कामांत मोठी पदवी नाहीं व मोठा पगारही नाहीं असें काम मी करावें–असें आहे तर तुह्मांस माझा पराक्रम ठाऊक नाहीं आणि तो पराक्रम सनदेपेक्षांही पोकळ वाटतो असें होतें. तो एक वर्ष स्वस्थ आपल्या घरीं राहिला. पुढें सन १७५५ त उन्हाळ्या दिवसांत फ्रेंच व इंदियन यांजबरोबर लढाई करण्याकरितां जनरल ब्रादाक हा विलायतेहून दोन पलटणें घेऊन आला आणि वर्जिनियेंत उतरला, त्यावेळेस वाशिंगूतनाला वालंतीयर एदिकांप ही पदवी देऊन पुनः चाकरीवर बोलावलें. वाशिंगूतन ह्मणाला स्वदेशाच्या कल्याणाकरितां चाकरी धरिली आणि पैसा किंवा कीर्ति ह्यांकरितां धरली नाहीं, हा विचार केला तर माझी स्तुत्य इच्छा पाहून लोक चांगलें केलें असें ह्मणतील.

ब्रादाक यानें स्वारी केली तींत त्याचा पराजय झाला, हें प्रसिद्धच आहे. बेंजामिन फ्रयांक्लिन हा सर्व प्रांतांतील डांकेच्या खात्यावर मुख्य होता त्यानें पुष्कळ प्रयत्न करून दीडशें छकडे व घोडीं हीं, तोफा व सामान नेण्याकरितां मिळवून दिलीं. हें काम त्यानें फुकट केलें. ब्रादाक ह्यानें विलायतेंतील मंत्री लोकांस पत्र पाठविलें कीं, एथील अधिकारी आळशी आहेत. परंतु त्याच पत्रांत असें त्यानें लिहिलें आहे कीं, बेंजमिन फ्रयांक्लिन ह्यानें स्वामिकार्याविषयीं युक्ति व उद्योग केला तसा मी येथें कधीं पाहिलाच नाहीं. ब्रादाक हा डिक्वेस्नी किल्ल्यावर हल्ला करण्याकरतां

पश्चिमेकडे चालता झाला. त्याच्या मनांत असें होतें कीं, फ्रेंच लोकांस इंग्रजांच्या मुलखांतून असें हाकून लावावें कीं, ते पुनः येणारच नाहींत. तिकडे वाट तर फार खडकाळ व कठीण होती; तेव्हां ब्रादाक ह्यानें वाशिंग्तनास असें विचारिलें कीं, कोण या रीतीनें आपण जावें ह्मणजे उत्तम ? वाशिंग्तन ह्मणाला त्यास माझ्या कडून जितक्या युक्तीनें सांगवलें तितक्या युक्तीनें असें सांगितलें कीं, निवडक लोक, हलक्या तोफा, आणि आवश्यक सामान इतकें घेऊन पुढें चलावें; मागून बाकीचें सामान, जड तोफा व बाकीचे लोक हळूहळू घेऊन येतील. हें सांगणें त्यास मान्य झालें. मग सैन्याचे दोन विभाग केले, त्यांत एक बाराशें लोकांचा होता. त्या लोकांस घेऊन जनरल ब्रादाक साहेब त्वरेनें पुढें चालता झाला. बाकीचे लोक घेऊन कर्नेल दनबार हा मागून सावकाश जात होता. वाटेनें वाशिंग्तनास ताप लागला त्यामुळें पुष्कळ दिवस त्याचा खोळंबा झाला. तो बरा झाल्यावर जुलई महिन्याच्या ८ व्या तारखेस जनरल साहेबापाशीं जाऊन हजीर झाला. त्यावेळेस तें सैन्य मानांगेहेला नामें नदीच्या तीरावर उतरलें होतें. ती जागा दुर्वेस्त किल्ल्यापासून पंधरा मैलांच्या आंत होती. त्या किल्ल्याशीं पोहोंचण्यास दोनदा नदी उतरावी लागणार होती व कांहींसें दक्षिणेकडे जावें लागणार होतें. स्पार्क साहेब असें लिहितो कीं, ९ व्या तारखेस प्रातःकाळीं सर्व तयारी झाल्यानंतर योघागनीच्या मुखाच्या खालच्या बाजूस सर्व सेना नदी उतरून चालती झाली. ती सेना

मानांगहेला नदीच्या दक्षिण बाजूनें मोठ्या बंदोबस्तानें चालली, त्यावेळेस तिची शोभा इतकी दिसली कीं, वाशिंगूतन नेहमीं असें ह्मणत असे कीं, ह्या वेळेप्रमाणें सेनेची शोभा मीं कधींच पाहिली नाहीं. प्रत्येक मनुष्याचा पोशाग नीट जसा असावा तसा होता, सेनानी लोक सेनास्तंभ धरून चालले होते, त्यांच्या बाहुभूषणांवर सूर्यकिरण पडले होते, उजव्या बाजूस नदी वाहत होती आणि डाव्या बाजूस हिरव्या चार झाडांची गार छाया त्यांजवर पडली होती, सरदार व शिपाई लोक मोठ्या आनंदांत होते व त्या उभयतांस एकसारखेंच वाटत होतें कीं, आपला जय खचित होईल. ते नुकतेच दुसरी नदी उतरून किल्ल्याच्या रस्त्यावरील एक्या टेकडीवर चढत होते, तों एकाएकीं शत्रूंनीं बंदुकीच्या दोन फैरा झाडल्या, त्यामुळें सैन्यांत अगदीं घोटाळा झाला. ते शत्रु कोठें होते तेंही त्यांस दिसलें नाहीं. सैनिक लोक अगदीं भयाभीत झाले त्यांस देहभान राहिलें नाहीं. ते उगीच सुमारानें अरण्यांत बंदुका सोडीत व अव्यवस्थितपणें एकामेकांवरच पडत. त्यांजवर उजव्या बाजूनें व डाव्या बाजूनें एकदम गोळ्यांचा वर्षाव चालला होता त्यामुळें त्या लोकांची भयानें दाणादाण झाली होती ह्याप्रमाणें तीन तास पर्यंत हें युद्ध चाललें होतें. ज्या खडकाच्या आड फ्रेंच लोक व इंदियन लोक लपले होते त्यांच्या आरुयानें ते नेमक्या गोळ्या मारीत. व ब्रितिशांचे शिपाई सरासरी धोरणानें गोळ्या मारीत त्या कितीएकवेळ त्यांच्या-

तल्या त्यांच्यांतच परस्परांस लागत होत्या. त्या लढाईंत लोक पुष्कळ पडले. जखमी झालेले लोक व पडलेले लोक मिळून निम्यांपेक्षां अधिक होते. शायशी सरदारांपैकीं, सहा मारले गेले व सदतिसांस जखमा लागल्या. जनरल ब्रादाक साहेबास गोळीची जखम लागून तो तिनेंच मेला. त्या युद्धांत वाशिंगूतन घोड्यावर बसून चोहों दिशांस मोठ्या धैर्यानें हिंडत असे व सेनेंतील लोकांस जनरल साहेबांचे हुकूम कळवीत असे. तो शत्रूंस गोळी घालण्यास अगदीं उघड दिसत असे. लढाईनंतर त्यानें आपल्या भावास पत्र लिहिलें त्यांत त्यानें असें ह्मटलें आहे कीं, मी या लढाईंतून वांचलों हें ईश्वरानेंच केलें. मी वांचेन किंवा मला कोणी राखील असें नव्हतें. मला चार गोळ्या लागल्या, त्यायोगानें माझ्या अंगरख्यास भोंकें पडलीं व दोन घोडे मी वर बसलों असतां गोळ्या लागून पडले. मृत्यु माझ्या आसपासच्या लोकांस नेत होता; परंतु मला धक्काही लागला नाहीं.

ह्या लढाईंत इंग्लिशांचा पराजय झाला त्याविषयीं पुष्कळ दिवसपर्यंत लोक जिकडेतिकडे बोलत होते. ब्रादाक साहेब मरण पावला, त्याचें नांव निघालें ह्मणजे पुष्कळ तऱ्हेनें लोक त्याची निंदा करीत. ह्या युद्धांत जे मुख्य लोक होते त्यांपैकीं वाशिंगूतनाची मात्र ह्या कामांत प्रतिष्ठा झाली. जनरल ब्रादाक साहेबास वाशिंगूतनानें ज्या युक्तीच्या व शहाणपणाच्या गोष्टी सांगितल्या त्यांजकडे त्यानें दुर्लक्ष केलें असें ठरलें. त्यांपैकीं मुख्य गोष्ट

ही होती कीं, शत्रु काय करितात व ते कोठें आहेत ह्याविषयीं सर्व गोष्टी कळण्याकरितां सेनेच्या पुढें इंदियन लोकांस पाठवावें, असें वाशिंगृतनाचें ह्मणणें होतें; आणि पुढें त्याच्याच शौर्यानें व सावधगिरीनें बाकीची सेना नदी उतरून मागें गेली. ह्या कारणामुळें जेथें जेथें मानांगहेला येथील लढाईची गोष्ट निघते, तेथें तेथें वाशिंगृतनाची वाहवा करतात. पुढें त्याला नेहेमींची लश्करी कामाची सनद नव्हती ह्मणून कांहीं वेळपर्यंत मौंत वर्नन येथें जें त्यास घर मिळालें होतें तेथें जाऊन तो रिकामा राहिला. ती जागा त्याच्या भावाची मुलगी मेल्यामुळें त्यास प्राप्त झाली होती. त्यावेळेस त्या प्रांतांतील अदुजुतंत जनरलच्या कामास तो लागला. वसाहतवाल्यांचें सर्व लक्ष त्याच्याकडे लागलें होतें आणि पुढें लवकरच त्याला चाकरी धरावी लागली. जनरल ब्रादाक साहेबाचा पराजय झाला त्या योगानें सर्व प्रतींच्या लोकांच्या मनांत सेनेविषयीं इतकी काळजी उत्पन्न झाली कीं, देवळांत पाद्री लढाईच्या गोष्टींविषयीं व देशप्रीतीविषयीं लोकांस व्याख्यानें देऊं लागले. पाद्री लोक आपल्या श्रोते मंडळीस लढाईकरितां उत्तेजनही देऊं लागले. त्या वेळेस एक्या पाद्रीनें जें संभाषण केलें तें पुढेंही लोकांनीं स्मरण धरावें असें होतें. पाद्री देवीस साहेब हा आपल्या श्रोत्यांस धर्मप्रतिपादन करीत असतां त्यानें त्यांस वाशिंगृतनाची गोष्ट सांगितली. त्या वेळेस लोकांच्या मनावर फारच ठसा उमटला व पुढेंही तें भाषण इतर

ग्रंथकर्त्यांनीं आपल्या ग्रंथांत उतरून घेतलें आहे. वर्जिनियांतल्या सेनेंतील लोकांच्या धैर्याचें वर्णन त्यानें असें केलें आहे कीं, "लोकांनीं लक्षांत धरावयाजोगें धैर्याचें उदाहरण वाशिंगूतनाचें आहे. परमेश्वरानें त्या पुरुषास अशा चमत्कारिक रीतीनें वांचविलें ह्यावरून तो स्वदेशास फार उपयोगी कामें करण्याकरितांच ठेविला आहे असें मला वाटतें." या गोष्टीपासून वसाहतवाल्या लोकांच्या मनांत लढाई-विषयीं उत्तेजन आलें आणि त्यांच्या कायदे करणाऱ्या मंडळीनें चार लाख रुपये देऊन नवीन सेनेची तयारी करण्याचा बेत केला, व वाशिंगूतनास विनंती केली कीं, आपण मुख्य सेनापति व्हावें. त्यानें चाकरी पतकरण्याच्या पूर्वीं त्या लोकांकडून पुष्कळ गोष्टी कबूल करून घेतल्या होत्या. त्यांतील ही एक होती कीं, सरदारांच्या नेमणुकींत माझें संमत असावें, सेनेविषयीं कायदे चांगले करावे, लोकांस पगार देण्यास अगदीं विलंब होऊं देऊं नये, आणि धान्यादिक पदार्थांचा पुरावा करण्याची तजवीज चांगली ठेवावी.

सन इसवी १७५५ च्या पाउसकाळीं वाशिंगूतनास सेनापतीचें काम मिळालें, तेव्हांपासून तो अधिकार त्याजकडे सुमारें तीन वर्षें होता. या तीन वर्षांत त्यानें काय काय केलें याचें वर्णन केलें असतां वाचणारांस त्रास मात्र येईल सबब त्याची येथें गरज नाहीं. यास्तव येथें एवढें लिहिलें ह्मणजे पुरे कीं, वाशिंगूतनाचे ठायीं चातुर्य, शांति, दृढनिश्चय, आत्म-

संयमन, व्यवस्था वगैरे जे गुण होते त्यांचा यावेळीं त्यास फारच उपयोग करावा लागला. सैन्याविषयीं सर्व कामांत राज्यकारभार करणारे लोक फार अळस करीत व विलंब लावीत यामुळें त्यास आपला बचाव करण्याकडेच फार लक्ष द्यावें लागे, यामुळें त्यास आपलें युद्धकौशल्य प्रकट करून कीर्तिसंपादन करण्यास अवकाश सांपडला नाहीं खरा; परंतु यावेळीं आपलें संरक्षण करण्याच्या ज्या युक्ति तो शिकला त्या पुढें त्याच्या फार उपयोगीं पडल्या. जी लढाई चालविली तिचा मुख्य उद्देश ओहिओ घेण्याचा होता, तो सन इसवी १७५८ त सिद्धीस गेला. मग वाशिंगूतन लागलाच राजीनामा देऊन मौंत वर्नन येथें गेला. ही लढाई त्यानें फार चांगली चालविली ह्मणून सर्व लोकांत वाशिंगूतनाची फार चहा झाली व सैन्यांतील लोकही त्याजवर खुष होऊन त्याचें कल्याण इच्छूं लागले.

## सन १७५९ पासून १७७५ पर्यंत वाशिंग्तनानें कोणत्या घरगुती व सरकारी कामांत काळ घालविला त्याचें वर्णन.

---

सन १७५५ ह्या सालांत वाशिंग्तन न्यूयार्क शहर पाहावयास गेला असतां तेथें त्यास आपलें लग्न व्हावें अशी दुसऱ्यानदा इच्छा उत्पन्न झाली. त्या ठिकाणीं त्याच्या एका जिवलग मित्राच्या बायकोची मिस् मेरी फिलिप्स या नांवें एक वहीण होती तिजवर त्याचें मन बसलें होतें. परंतु त्यास आपल्या मनांतील उद्देश उघड करून दाखविल्यावांचूनच एकाएकीं न्यूयार्क शहराहून जावें लागलें ह्मणून फिलिप्स हिनें कप्तान मारिस ह्मणून वाशिंग्तनाचा एक स्नेही होता त्याबरोबर लग्न केलें. मारिस व वाशिंग्तन यांचा स्नेह ब्रादाकच्या स्वारींत पडला होता. नंतर पुढें सन १७५८ त वाशिंग्तन जेव्हां सत्तावीस वर्षांचा झाला त्यावेळेस त्यानें विवाह करण्याचा पक्का निश्चय केला आणि सन १७५९ त फेब्रुआरी महिन्याच्या सहाव्या तारिखेस मार्था नामक एका तरुण विधवेशीं त्यानें विवाह केला. ही स्त्री चांगलीच सुरेख होती; आणि लिहिणें, वाचणें वगैरे जे गुण सभ्य बायकांमध्यें असावे त्या गुणांनीं संपन्न असून सधन अशीही होती. हिला पहिल्या घरचे दोन मुलेगे होते.

---

१ जे. ती. हेदली असें लिहितो कीं, हा विवाह ता. ६ जानेवारीस झाला. त. छा.

२ जे. ती. हेदली लिहितो कीं, एक मुलगा ६ वर्षांचा व दुसरी मुलगी ४ वर्षांची अशीं दोन मुलें होतीं. त. छा.

हिच्या पहिल्या नवऱ्यानें मरतांना आपली सर्व मालमत्ता हीस व दोघां मुलांस निमेनिम वांटून दिली होती.

वाशिंगूतनाची यापुढील पंधरावर्षें घरगुती काम पाहण्यांत व सरकारी कामकाजांत गेलीं. त्याच्या घरची जमीन पुष्कळ होती तिची त्यास देखरेख करावी लागत असे. वर्जिनिया प्रांतांत सरकारी काम वहिवाटणाऱ्या सभेंत तेथील लोकांनीं ह्यास सभासद नेमलें होतें, त्याबद्दल त्यास सरकारी काम पुष्कळ पाहावें लागे.

त्या काळचे वार्जिनिया प्रांताचे दुसरे लोक जसें हबसी गुलाम लोक विकत घेऊन त्यांजकडून आपलें शेतकीचें वगैरे काम चालवीत असत तसें वाशिंगूतनही करीत असे. त्या काळच्या लोकांच्या समजुती निराळ्या होत्या, त्यामुळें मनुष्यास अत्यंत नीच जी दास्यावस्था तींत राखणें हें अत्यंत अश्लाघ्य व पापदायक कर्म आहे, असें जसें अतांच्या ज्ञानी लोकांस वाटतें तसें वाशिंगूतनास वाटत नव्हतें सें दिसतें. परंतु एरवीं पाहिलें असतां परोपकारी व सदसद्विचार करणारा जो हा विख्यात पुरुष त्याच्या मनांत हा असल्या कृत्याचा अधमपणा आला नाहीं, हें पाहून आह्मांस फार वाईट वाटतें, असो.

सन १७६० सालची त्यानें स्वहस्तानें लिहिलेली एक वही आहे, तींतून पुढें आह्मी कांहीं लेख उतरून घेतों. त्यावरून तो आपल्या शेतापोताची देखरेख कशी काय करीत असे, हें आमच्या वाचणारांच्या मनांत

येईल. "फेब्रुआरी तारीख ५—आजरोजीं मी आपलें रान पाहावयास गेलों होतों, तेथें स्तीफन एकसारखा काम करीत होता, हें पाहून मला मोठें आश्चर्य वाटलें. पुढें कांहीं माणसें लांकडें तोडीत होतीं तिकडे गेलों आणि पाहिलें तों ताम, जार्ज, मैक आणि विली ह्या चौघांनीं काल दहा वाजल्यापासून एकशें वीस फुटीच काय तें काम केलें. त्यावरून मी खालीं बसलों आणि पाहिलें तों ताम, आणि मैक ह्या दोघांनींच तीस मिन्युतांत एक पापलर नामक वृक्षाच्या बुंधाजवळचीं झुडपें तोडून टाकिलीं. त्या खोडावर दहा फूट लांबीच्या दोऱ्या मारिल्या आणि तें खोड एक एका बाजूस दहादहा फूट कापलें. नंतर त्यांनीं तें खोड आडवें चिरलें. मग कांहीं वेळ, आतां काय करावें असा विचार करून त्यांनीं तें दोन ठिकाणीं चिरलें व तें चौकोनी करण्याकरितां नीट तोडून त्यावर दोऱ्या मारिल्या. इतक्या सर्व कृत्यास पंचवीस मिन्युतें लागलीं व तें खोड कापून अगदीं तयार करावयास त्यांस आणखी वीस मिन्युतें लागलीं. या प्रमाणें ७५ मिन्युतांत ह्मणजे सवा तासांत त्यांनीं वीस फुटी काम केलें. या हिशेबानें त्यांनीं दिवसाच हल्लीं जें मान आहे त्या मानानें सकाळपासून संध्याकाळ पर्यंत एक एकास न्याहरीस दोन तास सोडून बाकीच्या वेळांत एकशें पंचवीस फुटी काम करावें व दिवस जसा जसा मोठा होत जाईल तसतसें अधिक अधिक काम करावें. हें काम चाललें असतां जार्ज आणि विली ह्यांनीं तक्ते चिरण्याचें तीस फुटी काम

केलें. या मानानें त्यांनीं सगळ्या दिवसांत एकशें ऐंशी फुटी काम करावें. आतां हें काम पापलर झाड तोडण्याचें झालें. परंतु दुसरें झाड तोडण्याच्या व कापण्याच्या कामांत जर कांहीं भेद असला तर पुढें तें काम होतांना पाहावें ह्मणजे समजेल. असो."—"मार्च तारीख ८—आज पुष्कळ पाऊस पडून आमच्या शेतांत वीज पडली तिच्या योगानें हे हबसी लोक जायां झाले. त्यांपैकीं कांहींएकांस तर मोठी दुःखापत झाली होती. त्यांच्या अंगांतून रक्त काढून टाकण्यानें ते बरे झाले".—"मार्च तारीख २६—आजच्या रोजीं बहुतेक वेळ मी आपल्या कल्पनेनें नव्या प्रकारचा नांगर करण्यांत घालविला."—स्पार्क साहेबानें वाशिंगूतनाचें चरित्र लिहिलें आहे त्यांत त्यानें ह्या प्रकारच्या नित्यकृत्यसंबंधी पुष्कळ चमत्कारिक तपशीलवार गोष्टी लिहिल्या आहेत.

त्याच्या आगरांत मुख्य उत्पन्न ह्मटलें ह्मणजे तमाखूचें असे. बहुतेक तमाखू तो लंदनच्या बाजारास पाठवी व कधीं कधीं लिवरपूल व ब्रिसल एथेंही थोडथोडी पाठवी. त्यावेळेस वर्जिनिया प्रांतांतील सर्व श्रीमंत लोकांची चाल अशी असे कीं, त्यांस नित्य खर्चास जे जिन्नसपान्नस अथवा कापडचोपड लागे तें ते लंदनच्या बाजारांतून एकदम आणवीत. त्या चालीप्रमाणें वाशिंगूतन दरसाल दोनवेळ लंदनांत आपल्या गुमास्त्यास जिनसांची याद पाठवी. त्या यादींत त्यास घरगुती खर्चास जें धान्य वगैरे लागे तें; नांगर, खोरीं, कुदळी, विळे

वगैरे शेतकीच्या कामास लागणारीं आउतें; खोगीर, लगाम वगैरे घोड्याचें सामान; आणि त्यास व त्याच्या कुटुंबास जीं जीं वस्त्रें लागत तीं; इत्यादि सर्व लिहिलेलें असे. तसेंच कोणत्या प्रकारचे जिनस पाहिजेत हेंही त्या यादींत तो लिही. त्यानें लंदनांत एका शिप्यास पाठिवलेली एक चिटी आहे तींत तो असें लिहितो कीं, माझी उंची सहा फुटी आहे. त्याची बरोबर उंची पाहतां सहा फुटी आणि तीन इंच होती. व ह्या उंचीच्या मानानें पाहिलें असतां तो अंगानें किरकोळ होता व त्याचे हातपाय लांब असत. वाशिंगूतनास लंदनास आपला एक गुमास्ता बाळगावा लागे. त्या गुमास्त्याच्या द्वारानें तो आपणास जो जो जिनस पाहिजे त्या त्या जिनसाच्या चिट्या लंदनच्या उदम्याकडे पाठवी. त्या गुमास्त्यास सर्व जिनसांची एक याद व ते जिनस ज्या दुकानांतून घेतले असतील त्या दुकानदारांनीं त्याजकडे पाठविलेल्या किमतीच्या चिट्या वाशिंगूतनाकडे पाठवाव्या लागत. ह्या देण्याघेण्याच्या कामांत तो इतका सावध असे कीं, त्यानें एक निराळीच वही घालून ठेविली होती. तींत तो लंदनास आपण पाठविलेल्या चिट्यांचा व तिकडच्या उदम्यांकडून आलेल्या सर्व पावत्यांचा उतारा करून ठेवीत असे. याप्रमाणें घरगुती कामावर त्याची पूर्ण देखरेख असे तेणें करून त्यास सर्व जिनसांच्या किमती बरोबर कळत व गुमास्त्यानें कृत्रिम, अफरातफर किंवा सुस्ती वगैरे केली असतां त्यास तें तत्काळ कळे. तसेंच त्यास कोणी यत्किंचित् जरी ठकविलें तरी तो

तें सांगे व तें कपट तो लागलेंच दुसऱ्या पत्रांत लिहून आपल्या गुमास्त्यास कळवी. याप्रमाणें वाशिंग्तनाचें चित्त घरगुती कामाकडे असे, ह्मणून तें सरकारी कामांतून निघालें होतें कीं काय ? बिलकूल नाहीं. त्या कामांतही त्याची दक्षता व सावधपणा असेच. यावेळीं मेरीलांद येथील राजधानी अनापोलिस ह्मणून गांव असे. हें गांव श्रीमान लोकांचें स्थान आहे ह्मणून लोकांत फार प्रसिद्धि असे. ह्या गांवीं वाशिंग्तन वारंवार जात असे. तेथें तो गेला असतां लोक त्याचा जो जो आदर सत्कार करीत तो तो ते मौंतवर्नन एथें आले असतां तो परत करी. आपल्या घरीं कोणी आला असतां त्याचा उत्तम प्रकारें पाहुणचार करण्याविषयीं त्याची मोठी प्रख्याति होती. तो घरीं असला ह्मणजे त्याकडे जेवायखायला चार मित्र किंवा चार पाहुणे आल्यावांचून बहुत दिवस जात नसत, इतकें त्यास मंडळीचें वेड होतें. तो कधींकधीं जेव्हां अनापोलिस एथें जाई तेव्हां तेथें तो नाटकाचे वगैरे खेळ पहावयास जाई. घरीं असला ह्मणजे त्याची मुख्य कर्मणूक ह्मटली ह्मणजे पारध. चांगली हवा पडली असली ह्मणजे आठवड्यांतून दोनदा किंवा तीनदा घोड्यावर वसून बरोबर कुत्रे व शिंगवाले घेऊन आपले शेजारी पाजारी चार गृहस्थ किंवा मौंतवर्नन एथें राहावयास आलेले कोणी गृहस्थ ह्यांस समागमें घेऊन तो शिकारीस जात असे.

वाशिंग्तन जमीदार होता ह्यास्तव त्यास त्या जमी-

ग्रंथ संग्रहालय नं....... ता.......

दारीच्या गांवासंबंधी पुष्कळ काम करावें लागे. तो मोठा चतुर व विचारी होता ह्यामुळें त्याचें लोकांत चोहींकडे मोठें वजन असे आणि त्याच्या शेजारच्या पाजारच्या लोकांत कांहीं तंटाबखेडा पडल्यास तो तोडण्याकरितां ते त्यास बोलावीत व कांहीं महत्वाचें काम काज करणें झाल्यास त्यामध्यें त्यास मसलत विचारीत. तो ज्या बुरो ह्मणून गांवीं राहात असे त्या गांवच्या देवळाचा कांहीं अधिकार त्याजकडे होता ह्यामुळें त्यास त्या गांवचेंही पुष्कळ काम करावयाचें पडे. बुरो गांवचा पाद्री वाशिंगूतनाची ही पुढील गोष्ट नेहमीं सांगत असे. त्या गांवचें देऊळ जुनें होऊन अगदीं मोडकळीस आलें होतें सबब एक नवें देऊळ बांधण्याचा निश्चय ठरून तें कोणत्या ठिकाणीं बांधावें हेंच ठरविण्याकरितां गांवच्या लोकांनीं पुष्कळ सभा केल्या. शेवटीं सगळ्या गांवकऱ्यांच्या दोन फळ्या पडल्या. कोणी ह्मणूं लागले जुनें देऊळ जेथें आहे तेथेंच नवें बांधावें; व कोणी ह्मणूं लागले कीं, जुनें देऊळ बरोबर गांवचे मध्यभागीं नाहीं, तर देऊळ सर्व गांवकऱ्यांस सारखें जवळ पडण्याजोगें गांवाच्या मध्यें जें ठिकाण असेल तेथें बांधावें. ह्या दोन पक्षांपैकीं पहिल्या पक्षाकडे बहुमत होतें. व शेवटच्या सभेंत जार्ज मासन ह्मणून वाशिंगूतनाचा मित्र व शेजारी एक गृहस्थ होता त्यानें उभें राहून सर्व गांवकरी यांस असें सांगितलें कीं, "आपले सर्व वाडवडील ज्या जुन्या देवळांत प्रार्थनेस जमत आले व जेथें आपल्या पूर्वजांचीं शरीरें पुरलीं आहेत अशा या जाग्याचा त्याग करणें

मला बरें वाटत नाहीं," वगैरे प्रकारचें त्याचें अत्यंत सालंकार, रसिक व वेधक असें भाषण ऐकून सर्व गांवकऱ्यांचें मन जुन्या ठिकाणींच देऊळ बांधण्याविषयीं वळलेंसें दिसूं लागलें. त्या प्रसंगीं वाशिंग्तनानें उठून उभें राहून आपल्या खिशांतून बुरो गांवाचा एक नकाशा काढून तो सर्व गांवकऱ्यांस दाखविला. त्या नकाशांत सर्व गांवकऱ्यांचीं घरें टांचलेलीं होतीं व देवळाची नवी व जुनी अशा दोन्ही जागाही टांचलेल्या होत्या. तो नकाशा पाहतांच नव्या ठिकाणींच देऊळ बांधावें असें सर्वांनीं एकदम मत दिलें.

वर्जिनिया प्रांतांतल्या सरकारी सभेंत वाशिंग्तन हा सभासद होता, त्याबद्दल जीं कामें करावीं लागत तीं करण्यांत तर तो फारच सावध असे. असें सांगतात कीं, एका प्रसंगीं तो सभेंत येऊन बसल्यावर सर्व सभेनें सांगितल्यावरून सभेंतील मुख्य वक्ता उठून उभा राहून वाशिंग्तनास "तुह्मी लढाईंत जीं अद्भुत कृत्यें केलीं त्यांबद्दल या वसाहतींतील सर्व मंडळी तुमचा मोठा उपकार मानिते," इत्यादि योग्य स्तुतीच्या गोष्टी बोलला. तें स्तुतीचें भाषण ऐकल्यावर त्यास उत्तर देण्यास वाशिंग्तन उठून उभा राहिला; परंतु त्याच्या तोंडांतून एक शब्दही निघेना हें पाहून वक्ता मोठ्या चातुर्यानें त्यास ह्मणाला कीं, "वाशिंग्तन साहेब, तुह्मी खालीं बसा, तुह्मी जसे शूर व पराक्रमी आहां तसेच मर्यादशीळही आहां व तुह्मी मोठालीं कामें करूनही त्याबद्दल लोकांनीं स्तुति केली असतां ती ऐकण्यास तुह्मांस संकोच

वाटण्याचा जो हा गुण तुमच्या अंगीं आहे त्यापुढें वक्तृत्व हा माझा गुण कांहींच नाहीं." वाशिंगृतनाची चाल अशी असे कीं, जेव्हां जेव्हां सभा भरेल तेव्हां तेव्हां तेथें जावयाचें, गैरहजर ह्मणून कधीं राहावयाचेंच नाहीं. तो सभेंत मात्र बहुतकरून बोलत नसे; जर बोललाच तर क्वचित् एखादे वेळेसच बोले. परंतु सभेंत जी जी गोष्ट चाले तिचा तो लक्षपूर्वक विचार करी व जेव्हां कधीं तो बोले तेव्हां विषयास अगदीं लागून ज्या गोष्टी असत त्याच तो बोले. त्याचें चरित्र लिहिणारा एक गृहस्थ असें ह्मणतो कीं, "तो विषय पूर्ण समजून घेई. परंतु त्यानें पांडित्ययुक्त मोठें लांबलचक भाषण केलें किंवा आवेशाचा वादविवाद चालत असतां त्यांत तोंड घातलें असें कधींही घडलें नाहीं. सरकारी सभांमध्यें त्याचें वजन असे तें वाक्चातुर्यानें आलेलें नव्हतें; तर तो मोठा अक्कलवान् व दक्ष होता तेणेंकरून आलेलें होतें". अमेरिकाखंडांतील वसाहती व इंग्लंद देश यांच्यामध्यें जो तंटा उत्पन्न झाला त्याच्या आरंभीं अमेरिकेंतील इतर लोकांचीं नांवें जशीं प्रसिद्धीस आलीं होतीं तसें वाशिंगृतनाचें आलें नव्हतें, ह्याचें कारण, तो मोठा वक्ता नव्हता हें कदाचित् असावें. ह्यावरूनच कोणी असें सिद्ध करतात कीं, त्या तंट्याच्या आरंभीं आपल्या देशावरील जुना अंमल उडवून टाकून नवा स्थापावा असें त्याचें मत नव्हतें; परंतु वास्तविक पाहतां खरी गोष्ट ही आहे कीं, वाशिंगृतन हा पहिल्यापासूनच हेनरी राजादिकांच्या पक्षांतला

होता व त्यावरून हा तंटा कदाचित् मिटेल असें त्यास बहुत दिवस वाटत होतें. तरी छापील कागदांच्या कायद्यास तो उघडपणें प्रतिकूळ होता. तो त्यास "हा अन्यायाचा व लोकांची स्वतंत्रता बुडविण्याचा प्रकार आहे" असें स्पष्ट ह्मणत असे.

इंग्लंद आणि अमेरिका ह्यांचा तंटा वाढत वाढत अगदीं अणीबाणीवर येत चालला होता. पूर्वीं लार्द ब्रादफ़र्द हा वर्जिनिया प्रांताचा गवर्नर होता तो जाऊन त्याच्या जागीं लार्द दन्मोर हा सन १७७३ त गवर्नर होऊन आला त्यानें त्या प्रांताची हौस आफ़् बर्जेसस नामक सभा आपल्या इच्छेप्रमाणें चालत नाहींशी पाहून सभासदांस घरोघर निघून जाण्यास सांगितलें. पुढें सन १७७४ त पुनः सभा भरल्यावर अमेरिकन लोकांस लवकरच वर्त्तमान कळलें कीं, इंग्लंदच्या पार्लमेंत नामक सभेनें बोस्तन नामक बंदर खल्लास करून बाद करण्याविषयीं कायदा ठरविला. ही बातमी ऐकून तर लोक फारच चवताळले आणि मे महिन्याच्या २४ तारखेस हौस आफ़् बर्जेसस नामक सभेनें असें ठरविलें कीं, जून महिन्याच्या पहिल्या तारखेस इंग्लिश पार्लमेंत सभेनें बोस्तन बंदराविषयीं केलेला नवा कायदा अमलांत येणार आहे; तर त्या दिवशीं सर्वांनीं उपास करून मोठ्या नम्रतेनें परमेश्वराची प्रार्थना करावी कीं, "देवा! आह्मां गरीबांवर हा जो मोठा अनर्थ गुदरूं पाहत आहे त्याचें तूं निवारण कर." असा त्या सभेचा ठराव झाल्यावरून गवर्नर दन्मोर ह्यानें दुसऱ्या दिवशीं सभासदांस निरोप दिला, तेव्हां त्या सभा-

सदांपैकीं पुष्कळ लोक राली नामक चावडीसारखी एक जागा होती तेथें तत्काल जमले आणि तितक्याच मंडळीची एक सभा करून तींत असा विचार ठरविला कीं, या अमेरिका खंडांत ज्या इंग्लिश वसाहती आहेत त्या सर्वांनीं आपआपले मुखत्यार पाठवून एक सर्वसाधारण सभा करावी ह्मणून आपण सर्व वसाहतींच्या लोकांस पत्रें पाठवावीं. ही सर्व साधारण सभेची कल्पना आदल्या वर्षींच फ्रांक्लिन यानें काढली होती.

सन १७७४ त आगष्ट महिन्याच्या पहिल्या तारखेस वर्जिनिया प्रांतांतील सर्व परगण्यांतील लोकांनीं पाठविलेल्या मुखत्यारांनीं विलियम्सबर्ग एथें एक सभा करून सर्वांच्या संमतानें ह्या पुढील सात पुरुषांस वर्जिनिया प्रांताचे मुखत्यार करून त्यांस "कान्ग्रेस" नांवाच्या सर्व साधारण सभेंत पाठवावें असें ठरविलें. त्या सात असामींचीं नांवें:— पेतन रांदाल्फ, रिचार्द हेन्री ली, जार्ज वाशिंग्तन, पात्रिक हेन्री, रिचार्ड ब्लांद, बेंजामिन हारिस, आणि एद्मंद पेंदल्तन हीं होत.

सप्तंबराच्या सातव्या तारखेस हे सात असामी व इतर प्रांतांतून आलेले मुखत्यार हे सर्व फिलदेल्फिया नामक नगरांत जमले. इतर अकरा प्रांतांचीं नांवें:— न्यूहाम्पशीयर, -होदबेट, कनेक्तिकत, न्यूयार्क, न्यूजर्सी, मासाच्युसेत, पेन्सिल्वेनिया, दिलावर, मेरिलांद, नार्थकारोलैना, आणि सौथकारोलैना अशीं होतीं. याप्रमाणें ही नवीन "कान्ग्रेस" सभा होऊन सभासदांनीं काम करण्यास आरंभ केला. ह्या सभेचा मूळ उद्योग ह्मणून

इतकाच होता कीं, हिच्या सभासदांनीं इंग्लंदच्या राजास अमेरिका खंडांतील लोकांच्या दुःखाची दाद लागण्याकरितां विनयपूर्वक अर्ज्या कराव्या. इंग्लंदच्या लोकांस, "तुह्मी चांगले न्यायी आहां, तेव्हां आह्मांवर असा जुलूम होऊं देऊं नका." अशा प्रकारच्या मजकुराचीं पत्रें लिहावीं.

ह्या "कान्ग्रेस" सभेंत प्रत्येक सभासद कोणकोणतें काम करी याचा निश्चय बरावर करितां येत नाहीं. कां कीं, त्या सभेची तपशीलवार हकीकत छापून प्रसिद्ध केलेली नाहीं. तथापि ही गोष्ट अगदीं निश्चित आहे कीं, त्या सभेंत वाशिंगूतन हा मुख्य सभासदांपैकीं एक होता, व सर्व कामांत तो जी मसलत देई तीस सर्व सभासद पराकाष्ठेचा मान देत. पात्रिक हेन्री ह्मणून जो वर सांगितला तो मोठा वक्ता होता. त्यास कोणी एकदां असें विचारिलें कीं, ह्या कान्ग्रेस सभेंत श्रेष्ठ कोण? ह्या प्रश्नावर त्यानें असें उत्तर दिलें कीं, वक्तृत्वगुणानें जर ह्मटलें तर सौथकारोलैना येथील मि. रतलेज ह्मणून जो गृहस्थ आहे तो सर्वांपेक्षां श्रेष्ठ आहे; परंतु पक्की माहितगारी व मार्मिकपणा ह्या गुणांनीं पाहिलें तर वाशिंगूतन हा सर्व सभासदांपेक्षां श्रेष्ठ आहे.

ही "कान्ग्रेस" सभा सन १७७५ त मे महिन्याच्या दुसरे[1] तारखेस भरली. पहिल्या वर्षीं जे सभासद आले होते तेच बहुत करून ह्यावर्षींही आले होते. बेंजमिन फ्रांक्लिन हा मात्र तेवढा पेनसि-

---

१ जे. ती. हेदली ह्मणतो–ता. १० मे १७७५. त. छा.

ल्वेनिया प्रांतांतून नवा मुखत्यार आला होता. पहिल्या वर्षीं ह्या सभेनें इंग्लंदचा राजा जार्ज ह्यास जी अर्जी केली होती तिजपासून कांहींच झालें नाहीं. अमेरिकन लोकांचें स्वातंत्र्य मोडावें याविषयीं ब्रितिश पार्लमेंताचा विचार पहिल्या वर्षापेक्षां ह्यावर्षीं अधिक आग्रहाचा दिसूं लागला हें पाहून अमेरिकन लोकांनींही आपलें स्वातंत्र्य राखण्याचा पूर्ण निश्चय करून सर्व देशाच्या संमतानें असें ठरविलें कीं, परम त्वरा करून आपल्या रक्षणाचे जे जे उपाय होतील ते ते करावे. मग त्यांनीं बोस्तनबंदरांतील ब्रितिश सैन्यास वेढा देऊन जी फौज होती तीस अमेरिका खंडांतील फौज असें ठरवून पंधराव्या तारखेस जार्ज वाशिंगृतन यास "कमांदरिन् चीफ," ह्मणजे मुख्य सेनापति नेमिलें व इतर सर्व सभासदांनीं शपथा घेतल्या कीं, आह्मीं आमच्या प्राणांत प्राण आहेत तोंपर्यंत शरीरानें, मनानें व द्रव्यानें वाशिंगृतनास आमच्या कडून जितकी मदत होईल तितकी आह्मी करूं.

---

## स्वातंत्र्याकरितां लढाई.

सेनापतीचा अधिकार प्राप्त झाला त्यावेळीं वाशिंगृतनाचें वय त्रेचाळीस वर्षांचें होतें. त्यापासून पुढें आठ वर्षांचें त्याचें चरित्र व अमेरिकेचा त्या आठ वर्षांचा इतिहास हीं दोन्ही एकच आहेत. हा ग्रंथ अगदीं संक्षिप्त आहे ह्मणून ह्या काळच्या त्याच्या मुख्य मुख्य गोष्टी मात्र लिहिल्या आहेत; चांगलें तपशीलवार वर्णन केलें नाहीं.

मुख्य सेनापतीचें काम मिळाल्यावर वाशिंगूतनानें प्रथमतः आपलें सैन्य जमा करून त्यांत एकावर एक असे कामगार नेमून त्याची व्यवस्था केली. या सैन्यांतील लोक अगदीं दुबळे होते, त्यांपाशीं लढाईच्या सामानाचा पुरावा मुळींच नव्हता, किंवा असला तर फारच कोता होता. त्या फौजेंत शिपायांचे उद्देश साधारण फौजेंतील शिपायांच्या उद्देशांपेक्षां निराळेच असत. तींतील मोठाले कामगार एकमेकाचा मत्सर करीत. "कान्ग्रेस" सभेचे निश्चयही पक्के दृढ नसत. इतक्या सर्व अडचणींचा बंदोबस्त ठेवणें फार कठीण होतें. इतकीं विघ्नें होतीं तथापि त्यास त्या कामांत बहुत यश मिळालें. त्यानें आपल्या फौजेची व्यवस्था केली ती अशी कीं, सर्व फौजेच्या सहा टोळ्या केल्या; एकेका टोळींत सहा पळटणी केल्या; त्या सैन्यांत असा नियम केला होता कीं, एकेका प्रांतांतील सैन्यानें जमवेल तितकें एकत्र जमावें व त्या सैन्यावर त्याच प्रांतांतील सरदार असावा. सर्व फौजेचे त्यानें मोठे मोठे तीन भाग केले होते. एकएका भागांत बराबर पळटणी होत्या. सैन्याच्या कामांत घडामोड करणें वगैरे ती सर्व मुख्य सेनापतीसच करावी लागे. मुख्य जी कान्ग्रेस सभा ती त्यानें एकादी नवीन कल्पना काढली असतां ती पसंत करून तिचें ग्रहण करी; परंतु नवीन कल्पना काढणें, व्यवस्था करणें, इत्यादि सर्व मुख्य सेनापतीसच करावें लागे. जोंपर्यंत लढाई चालू होती तोंपर्यंत वाशिंगूतनानें मुख्य सभेशीं

सतत एकसारखा पत्रव्यहार चालूच ठेविला होता. त्याजकडून आलेलीं सगळीं पत्रें सर्व सभा भरून तिजमध्यें वाचीत व फौजेसंबंधीं कोणतीही मोठी गोष्ट कर्तव्य झाल्यास तो सांगे त्याप्रमाणें करीत. याप्रमाणें सर्व फौजेचें काम त्याच्या एकट्याच्या बुद्धी-प्रमाणें चाललें होतें. त्यास मुख्यसभेशीं पत्रव्यवहार ठेवावा लागून खेरीज निरनिराळ्या प्रांतांतील राज्य-कारभारांतील मुख्य मुख्य लोक, कायदे करणाऱ्या निरनिराळ्या मंडळ्या, तेथील सुभेदार वगैरे या सर्वांशीं-ही पत्रव्यवहार ठेवावा लागे.

वाशिंग्टनास मुख्य सेनापतित्व प्राप्त झाल्यानंतर त्याचें एक वर्ष बहुतेक ही व्यवस्था करण्याखालींच गेलें. त्यावर्षीं फारसा युद्धप्रसंग झालाच नाहीं. त्या सालाच्या शेवटीं जेव्हां फौजेस निरोप दिला, त्यावेळेस सगळी फौज ( ९६५० ) नऊ हजार सहाशें पन्नास इतकी होती. तिजपैकीं एक हजारांवर लोक रजेवर होते. ही रजा त्यांस दुसऱ्या वर्षीं पुनः चाक-री पतकरण्याकरितां द्यावी लागत असे. ही रजा देण्याची चाल मोठीच अडचणीची होती. वाशिंग्-तन यानें स्वतः एकेठिकाणीं असें लिहिलें आहे कीं, "मागील इतिहास पाहिले असतां आह्मांस या प्रसंगीं जशी अडचण होती तशी कोणासही होती असें सांप-डावयाचें कठीण. ती अडच ही कीं, आह्मांस सगळ्या सहा महिन्यांत दारू जवळ नसतां इंग्लंडच्या निवडक फौजेशीं टक्कर मारावयाची व सहा महिन्यांनीं पहिल्या फौजेस निरोप देऊन नवीन फौज तयार

करावयाची." असो, अमेरिकन लोकांस ह्या प्रकारच्या अडचणी होत्या खऱ्या; परंतु हिंवाळा अगदीं डोक्यावर आला होता त्यामुळें इंग्लिश लोकांच्यानें त्या अडचणींपासून आपलें हित करून घेववलें नाहीं.

वाशिंगूतनानें जेव्हां मुख्य सेनापतीचें काम स्वीकारिलें तेव्हां आपणास दरवर्षीं कांहीं दिवस मौंतवर्नन एथें राहावयास सांपडेल असें त्याचें धोरण होतें; परंतु ती गोष्ट होणें अशक्य असें त्याच्या अनुभवास आल्यावरून त्याची वायकोच दरवर्षीं हिंवाळ्यांत लढाई तहकूब झाली ह्मणजे जेथें त्याची छावणी असे तेथें जाई आणि वसंतांत लढाईस आरंभ झाला ह्मणजे पुनः मौंतवर्नन एथें परत येई. ह्यामुळें वाशिंगूतनास घरीं जाऊन आपल्या शेतवाड्या वगैरे पाहावयास सांपडत नसे, तथापि त्यानें घरगुती कामाची उपेक्षा अगदीं केली नाहीं. त्यानें आपल्या शेतवाडीचें वगैरे घरगुती काम लंद ह्मणून त्याचा कोणी नातलग होता त्याच्या गळ्यांत घातलें होतें. हा मनुष्य मौंतवर्नन एथें जें जें घडे व जें जें चालत असे त्या सर्वांची तपशीलवार हकीकत महिन्यांतून दोन तीन वेळा वाशिंगूतनाकडे लिहून पाठवी, व वाशिंगूतनही अगदीं नियमानें वेळच्या वेळीं त्याच्या पत्राचें उत्तर धाडी.

अमेरिकेंत इंग्लिश लोकांचा जो सुभेदार होता, त्याच्या जागीं सन १७७५ या सालीं जनरल हावे नामें दुसरा गृहस्थ इंग्लंदाहून आला. हा हावे तेथें फौजेची तयारी करीत होता. ही फौज न्यूयार्कावर

स्वारी करण्याकारितां तयार होत आहे असें पाहिल्यानें वाटत होतें; परंतु हावे याचा वास्तविक उद्देश नार्थकारोलैना प्रांतावर स्वारी करण्याचा होता. इकडे वाशिंगूतन बोस्तनावर हल्ला करण्याकारितां अगदीं सिद्ध होता. परंतु त्याच्या हाता खालच्या सरदारांच्या मनास ती मसलत न आल्यामुळें दार्चेस्तर नांवाचे किल्ले घेण्याचा प्रयत्न करावा असें ठरलें. आणि त्या ठरावाप्रमाणें अमेरिकन लोकांनीं सन १७७६ ह्यांत मार्चाच्या ४ थ्या तारखेस ते किल्ले हस्तगत केल्यावर पुढें १७ व्या तारखेस इंग्लिश लोक बोस्तन सोडून निघून गेले. या प्रसंगीं कान्ग्रेस सभेनें सभानायकाच्या सहीचें कृतज्ञतासूचक एक पत्र वाशिंगूतनास पाठविलें व त्याच्या नांवचें एक सैन्याचें पदक त्यांनीं स्थापलें. असो, जनरल हावे यानें बोस्तन सोडल्यावर त्याची फौज न्यूयार्कावर हल्ला करण्याचा विचार करीत समुद्रकिनाऱ्यानें घिरट्या घालीत होती. पुढें ती फौज जून महिन्याच्या २८ व्या तारखेस सादिहुक एथें उतरली त्यावेळेस वाशिंगूतनाच्या सैन्याची तयारी शत्रूच्या लोकांचा प्रतिबंध करण्याजोगी नव्हती, ह्मणून त्यांनीं लांग नामक बेट सर केलें आणि वाशिंगूतनास न्यूयार्क सोडून मागें हटून लायर नामक नदीच्या पलीकडे जावें लागलें. लांग बेटाजवळ पराजय झाल्यामुळें वाशिंगूनास आपल्या फौजेची चांगली नवी व्यवस्था करण्याची फारच जरूर वाटून त्यानें मुख्य सभेस एक पत्र पाठविलें, त्यांत त्यानें लिहिलें कीं, "ह्या पराजयावरून माझी अशी पक्की खातरी झाली कीं,

आपल्या देशाचें स्वातंत्र्य राहावें असें सभेच्या मनांत असल्यास ती गोष्ट अशा उपऱ्या फौजेच्या हातून कदापि घडावयाची नाहीं; तर त्या उद्देशाच्या सिध्यर्थ आपणास नेहमीची फौज ठेविली पाहिजे. ह्मणजे ही आपली लढाई संपे तोंपर्यंत एकदां ठेविलेली फौज काढणें कामाचें नाहीं, तरच लढाई चांगली चालून आपणास यश येईल; नाहीं तर वर्षाचे वर्षास नव्या ठेवलेल्या फौजेकडून कांहीं व्हावयाचें नाहीं; मी आपलें हें मत मागें अनेक वेळ सभेस लिहून कळविलें आहे; तर सभेनें याविषयीं चांगला विचार करावा." या प्रमाणें त्यानें निक्षून लिहिल्यामुळें सभेनेंही त्या गोष्टीचें चांगलें मनन करून त्यांनीं त्याच्या ह्मणण्याप्रमाणें फौजेसंबंधी सर्व कामाचा त्यास मुखत्यार केलें.

सुमारें याच वेळेस अमेरिकन लोकांनीं नवा कायदा केला, त्यांत "इंग्लंदच्या वसाहती" असें जें पूर्वी नांव होतें तें अगदीं मोडून टाकून तेरा प्रांत मिळून अमेरिकेंतील "युनैतेद स्तेत्स" ह्मणजे अमेरिकेंतील परस्परांशीं संबंध ठेवणारीं स्वतंत्र संस्थानें असें नांव दिलें. हा कायदा सेनापति वाशिंग्तन यास व त्या वसाहतींतील मुख्य मुख्य लोकांस फारच आवडला व त्यांस आपला व इंग्लंदचा सख्यभाव होणें असंभाव्य असें फार दिवसांपूर्वींच कळून आलें होतें त्याप्रमाणें अमेरिकन लोक स्वतंत्र झाल्यावर लवकर इंग्लंदाहून लार्द कर्दहावे हा राजाचा वकील होऊन अमेरिकेंतील लोकांशीं कांहीं तहाचीं कलमें बोलावयाकरितां आला; परंतु

हींच कलमें बोलण्याकरितां कांहीं वेळा पूर्वी तो आला असता तर कांहीं फळ झालें असतें. तो वेळ निघून गेल्यावर आला, यामुळें त्याच्या येण्यापासून कांहीं एक उपयोग झाला नाहीं.

याप्रमाणें हावे याची वकिली व्यर्थ झाल्यावर पुनः लढाई सुरू झाली. मागल्या हिंवाळ्यांत वाशिंगूतनास नवा पूर्ण अधिकार प्राप्त झाल्यावरून त्यानें पाहिजे तसा सैन्याच्या कामांत फेरफार केला होता व आपल्या मनाजोगी तयारी वगैरे केली होती; परंतु पुढें जून व जुलई या दोन महिन्यांत चांगली मोठीशी लढाई झाली नाहीं. तरी जुलई महिन्यांत एक मोठी सांगावयाजोगी गोष्ट घडली. ती ही कीं, फ्रेंच लोकांनीं अमेरिकन लोकांच्या कुमकेकरितां मार्किस लाफेती यास अमेरिकेस पाठविलें.

पुढें सन १७७७ चे अखेरीस अमेरिकन लोकांचा दोन वेळ पराजय झाला. एकवेळ सप्तंवराच्या ११ व्या तारिखेस ब्रादिवैन एथें झाला. दुसऱ्या वेळेस जर्मन तौन एथें झाला. या वर्षाच्या शेवटीं वाशिंगूतन हिंवाळ्यांत पालेफोर्ज एथें छावणी करावयास गेला. या हिंवाळ्यांत वाशिंगूतनास अनेक संकटें व दुःखें अशीं भोगावीं लागलीं कीं, तेणें करून तो खरा स्वदेशाभिमानी व खरा सहनशील होता असें स्पष्ट दिसून आलें. लंदन शहरामध्यें त्याच्या नांवाचीं बनाऊ पत्रें छापून एक ग्रंथ प्रसिद्ध केला. व कांहीं दिवसांनीं तींच पत्रें त्याच्या दावेदारांनीं न्यूयार्क शहरांत पुनः छापून त्या प्रांतांत चहूंकडे पसरतशीं केलीं. असो, याहीपेक्षां दुसरें एक

मोठेंच अरिष्ट आलें होतें, आणि त्याचें निवारण झालें नसतें तर मोठाच अनर्थ झाला असता. तें अरिष्ट हें कीं, त्याच्या हाताखालच्या कांहीं कामगारांनीं कट करून त्याचा नाश करण्याची मसलत केली होती. त्या मसलतीस कान्ग्रेस सभेंतील कांहीं सभासदही अनुकूल होते. ह्या कटांत कान्वे, गेतूस, व मिफ्लिन हे सेनापति मुख्य होते. त्यांचा बेत वाशिंगूतनाकडील मुख्य सेनापतीचा अधिकार काढण्याचा होता. प्रारंभीं त्यांनीं लोकांच्या मनांत वाशिंगूतनाविषयीं बरेंच वाईट भरून दिलें होतें. परंतु पुढें कान्ग्रेस सभेंतील लोकांतच तो योग्य व चांगला आहे असें बहुमत पडल्यावरून तिनें वाशिंगूतनासच त्या कामावर राखून त्याच्या शत्रूंचा कट मोडून टाकिला.

तसेंच ह्या हिंवाळ्यांत वाशिंगूतनाजवळ धान्याच वगैरे पुरावा चांगला नव्हता ह्यामुळें फौजेंत दंगे होण्याचे प्रसंग येत; परंतु त्यानें आपल्या चातुर्यानें व हुशारीनें त्या सर्व अनर्थांचें निवारण केलें. याप्रमाणें अनेक प्रकारच्या संकटांनीं परिपूर्ण असा तो हिंवाळा गेला.

सन १७७८ राच्या वसंत ऋतूंत वाशिंगूतनानें लढाईस पुनः आरंभ केला. एकंदर पाहतां सन १७७७ राचें वर्ष अमेरिकन लोकांसच हितावह असें गेलें. त्यावर्षीं इंग्लिश लोकांस फिलदेल्फिया सोडून समुद्रकिनाऱ्याकडे हटून जावें लागलें. तसेंच मन्मथ एथें जी मोठी लढाई झाली तींतही अमेरिकन लोकांचाच जय झाल्यासारिखें झालें, परंतु अमेरिकन ल

ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

कांस अतिशय ईर्षा होण्याजोगें वर्ष ह्मटलें ह्मणजे सन १७७८ राचें झालें. त्यावर्षीं त्यांचा व फ्रेंच लोकांचा मित्रत्वाचा तह होऊन फ्रेंच लोकांच्या राजानें अमेरिकन लोक स्वतंत्र आहेत असें मान्य केलें. हा तह मे महिन्यांत झाला. पुढें जुलई महिन्यांत फ्रान्साहून अमेरिकन लोकांच्या कुमकेकरितां बारा लहान व चार मोठीं अशीं सोळा गलबतें दाखल झालीं. पुढें हिंवाळ्यांत इंग्लिश लोकांच्या अमलांतला कानडा ह्मणून देश आहे त्यावर हल्ला करावा अशी कान्ग्रेस सभेंत मसलत निघाली होती. परंतु वाशिंग्तनानें ही चांगली नाहीं असें बहुत प्रकारें दाखविल्यावरून ती मोडली.

सन १७७९ वें वर्ष एकंदर पाहतां अमेरिकन लोकांस हितावहच गेलें. परंतु त्यांत महत्वाच्या ह्मणून फारशा गोष्टी घडल्या नाहींत. या वर्षांत कांहींशा जमेस धरावयाजोग्या दोन गोष्टी घडल्या. एक ही कीं, कांहीं इंदियन लोक इंग्लिशांकडे जाऊन मिळाले होते त्यांचें पारिपत्य करण्याकरितां त्यांवर अमेरिकन लोकांनीं स्वारी केली. दुसरी गोष्ट ही कीं, जुलई महिन्याच्या चवथ्या तारिखेस एका एकीं हल्ला करून त्यांनीं पाइंत नामक जागा घेतली.

लाफेती हा फ्रान्सास परत गेला होता तो सन १७८० च्या एप्रिल महिन्यांत फिरून अमेरिकेंत आला. त्यानें अमेरिकन लोकांस बातमी सांगितली कीं, फ्रेंच सरकार तुमच्या कुमकेकरितां एक आरमार पाठवीत आहे. त्यांत समुद्रावर युद्ध करणारी व

जमिनीवर युद्ध करणारी फौज आहे. ही फौज लवकरच येऊन पोंहोचेल. त्याप्रमाणें जुलई महिन्याच्या १० व्या तारखेस ऱ्होद्स बेट येथें फ्रेंच आरमार येऊन पोंहोचलें. त्यांत आठ लहान व दोन मोठीं अशीं दहा जहाजें होतीं. या आरमाराचा एक मुख्य अधिकारी होता. त्यावर भूमीवर लढणारी ५,००० फौज होती. तिचा मुख्य अधिकारी रोचंबो नामें सरदार होता. हें आरमार आल्यावर पुढें लवकरच रोचंबो व वाशिंगूतन यांची भेट होऊन त्यापुढें परस्पराच्या साहाय्यानें कसकशी लढाई चालू व्हावयाची हें त्यांनीं ठरविलें. या वर्षीं तादृश महत्वाची दुसरी कांहीं गोष्ट घडली नाहीं. कांहींशी जमेस धरावयाजोगी एक गोष्ट घडली ती ही कीं, या वर्षीं मेजर अंद्री याची चौकशी होऊन त्यास देहांत शिक्षा झाली. ती गोष्ट अशी—अमेरिकन लोकांच्या फौजेंत वाशिंगूतनाचे हाताखालीं आर्नाल्द ह्मणून एक सरदार होता, हा याच लढाईंत मोठें शौर्य व युद्धकौशल्य दाखवून मोठ्या अब्रूस आला होता, ह्मणून या वेळीं त्याकडे वेस्त पाइंत व दुसरे कांहीं किल्ले यांचा अधिकार दिला होता. हा मनुष्य बराच डौली व उधळ्या असे त्याजमुळें त्यास फार कर्ज झालें. तें फेडतां यावयाजोगी त्यास मिळकत नव्हती, तेणें करून त्याची बुद्धि फिरून तो इंग्लिशांस फितूर झाला. सुमारें सन १७७९ पासून त्यानें इंग्लिश लोकांचा मुख्य सेनापति जो सर हेन्री क्लिंतन याजबरोबर फितूरी पत्रव्यवहार चालविला होता. आणि तो अमेरिकन लोकांच्या फौजेंत झालेल्या मसलतीची वगैरे

बातमी त्यास गुप्तपणें कळवीत असे. पहिल्या पहिल्यानें त्यांचीं एकमेकाकडे जीं पत्रें जातयेत तीं नांवावांचून असत. परंतु शेवटीं आर्नाल्द यानें गुप्तपणा सोडून दिला. तेव्हां या फितुरापासून आपला नफा करून घ्यावा ह्मणून सर हेन्री क्लिंतन यानें आपल्या सैन्यांत शूर व हुशार असा अंद्री ह्मणून एक लहानसा कामगार होता त्यास आर्नाल्द याशीं मसलत वगैरे करण्याकडे नेमिलें. त्या परस्परांचीं कांहीं पत्रें "गस्तवास" व "जान अंदरसन" अशा कल्पित नांवांचीं जात येत असत. पुढें आर्नाल्द यास वेस्त पाइंत नामक किल्ल्याचा अधिकार मिळाल्यावर त्यानें तो किल्ला दग्यानें इंग्लिशांस देण्याची मसलत केली. ती सिद्धीस नेण्याकरितां अंद्री याची समक्ष भेट घेणें त्यास भाग पडलें. मग ती भेट कशी काय व्हावी त्याचा बेत ठरून अंद्री हा वलचर नांवाच्या एका गलबतांत बसून हद्सन नदीनें वर चढून किंग्स फेरी या जाग्याच्या जवळ कांहीं मैलांवर येऊन राहिला. तेथें त्याची व आर्नाल्द याची रात्रीं संकेताप्रमाणें भेट झाली. त्या रात्रीं त्यांचें सर्व काम उरकलें नाहीं, ह्मणून आर्नाल्द यानें अंद्री यास अमेरिकन लोकांच्या छावणींत स्मिथ नांवाच्या ज्या गृहस्थाच्या घरांत आपण राहत होता तेथें दिवसास लपून राहण्याचा आग्रह केला. त्यास तेथें ठेवून आर्नाल्द सर्व कागदपत्र वगैरे करावयाचें तें काम आटपून सकाळीं दहा वाजतां वेस्त पाइंतास माघारां निघून गेला. संध्याकाळीं

अंद्री यानें शिपाईगिरीचा पोषाक बदलून साधा पोषाक केला आणि आर्नाल्द यानें दिलेले कागदपत्र घेऊन स्मिथ याचें घर सोडलें आणि नदी उतरून पार जाऊन न्यूयार्क शहराकडे चालता झाला. त्याच्या मनांत वलचर नांवाच्या इंग्लिश जहाजाकडे माघारें यावें असें होतें, परंतु ती गोष्ट घडली नाहीं. दुसऱ्या दिवशीं त्यास तिघां अमेरिकन शिपायांनीं अडविलें आणि त्याचा झाडा घेतला त्यांत कागद सांपडले. मग त्यांनीं त्यास लागलेंच जवळच्या छावणींत नेलें आणि तेथील अधिकारी जामिसन यानें झाड्यांत सांपडलेलीं पत्रें पाहतांच तीं आर्नाल्द याच्या हातचीं आहेत असें त्याच्या नजरेस आलें. परंतु त्यानें असा मूर्खपणा केला कीं, आर्नाल्द यास पत्र पाठवून त्यास कळविलें कीं, एक मनुष्य कांहीं चमत्कारिक कागद घेऊन जात होता त्यास धरिलें आहे. तो आपलें नांव जान अंदरसन असें सांगतो. ही बातमी समजली यामुळें आर्नाल्द यास इंग्रज लोकांच्या छावणींत जाण्यास अवकाश सांपडला. इतक्यांत ही बातमी वाशिंग्‌तनास समजली. अंद्री यानें स्वतःच त्यास पत्र लिहून आपलें नांव गांव समजाविलें व अमेरिकन लोकांच्या सैन्यांत तो कसा आला हेंही त्यानें समजाविलें. त्यानें असें लिहिलें होतें कीं, "मी न कळतां अवचित अमेरिकन लोकांच्या छावणींत आलों. येथें येण्याचा माझा बेत नव्हता. आतां माझ्या मनाची काय स्थिति असावी याचा विचार आपणच कराल; व मी जसा

आलों तसा माघारां गेलों नाहीं ह्मणून मला किती वाईट वाटत आहे हें आपणास सांगावयास नको. मी जर बंदीवान झालों तर आपली सुटका कशी करावी याविषयीं माझ्या मनांत विचार पूर्वीं होताच. ह्मणून मी आपला शिपायाचा पोषाग टाकून साधा पोषाग केला होता आणि अमेरिकन लोकांची छावणी रात्रीं सोडून आडमार्गानें अमेरिकन लोकांच्या राज्याबाहेरच्या प्रदेशांत गेलों होतों; तेव्हां मला लोकांनीं सांगितलें कीं, 'आतां येथें अमेरिकन लोकांचा अंमल नाहीं. त्यांचे शिपाई वगैरे तुला येथें भेटणार नाहींत.' मग मी मोठ्या त्वरेनें न्यूयार्काकडे चालता झालों होतों; पण कांहीं उमेदवार शिपायांनीं मला धरून कैदी केलें. या प्रमाणें माझा विश्वासघात करून मला तुमच्या छावणींत आणिलें येणें करून मला ही नीच अवस्था प्राप्त झाली आहे." तापन एथें सैन्याचा तळ होता. तेथें अंद्री यास आणवून त्याची चौकशी करण्याकरितां वाशिंगूतनानें "कोर्तमार्शल" ह्मणजे सेनासभा बोलाविली. त्या सभेंतील लोकांनीं चौकशी करून शेवटीं असें ठरविलें कीं, अंद्रीवर चारत्वाचा दोष लागू आहे. आणि ह्या करितां देशाची चाल व कायदे ह्यांवरहुकूम ह्मटलें असतां त्यास देहांतदंड करणें हेंच योग्य आहे. सभेचा ठराव वाशिंगूतनाच्या मनास आला. अंद्री सुटावा ह्मणून क्लितन यानें व आणखी कांहीं लोकांनीं पुष्कळ प्रयत्न केला; परंतु वाशिंगूतनानें कोणाचीही भीड ऐकिली नाहीं.

अंद्री यास देहांत शिक्षा दिली असतां त्यांत निष्ठुरता दिसून येईल असें वाशिंग्तनास दिसून आलें. परंतु तो कर्तव्यकर्मानें बांधला गेला होता ह्यामुळें त्याच्यानें अंद्रीच्या सुटकेविषयीं मनावर घेववेना. इंग्लिश लोकांचा जनरल सर हेन्री क्लिंतन यानें विश्वासघातकी जो आर्नाल्द त्यास शत्रूच्या ह्मणजे वाशिंग्तनाच्या स्वाधीन केलें असतें तर मात्र अंद्री सुटण्याचा कांहीं संभव होता. परंतु असें करण्यांत आपल्या देशाची मातबरी राहत नाहीं असें जाणून क्लिंतन याच्यानें आर्नाल्द यास शत्रूच्या स्वाधीन करवेना. इकडे हतभाग्य व तरुण जो अंद्री त्यानें मरणांत शिक्षा थोर मनानें भोगिली.

आपल्या मरणाच्या आदल्या दिवशीं ह्मणजे आक्टोबर महिन्याच्या १ ल्या तारखेस अंद्रीनें वाशिंग्तनास पत्र लिहिलें, तें येणें प्रमाणें:— "आब्रूच्या कामाकडे मी आपलें सर्व आयुष्य घालविलें आहे व माझ्या मनाला खाण्याजोगें कर्म माझ्या हातून आजपर्यंत घडलें नाहीं. ह्यामुळें मला मरणाचें भय अगदीं वाटत नाहीं. अशा संकटसमयीं आपणांस मी एकच प्रार्थना करितों, ती आपण मान्य केली असतां मरणसमयीं मला दुःखांत सुख होईल. आपण माझी प्रार्थना नाकारणार नाहीं, अशी मी आशा धरून आहें. माझ्यासारख्या शिपायाविषयीं आपल्या व आपल्या सेनासभेच्या मनांत करुणा उत्पन्न होऊन माझ्या आब्रूला अनुरूप असा देहांत दंडाचा प्रकार आपण योजालच. आणि आपण जर करितां मला

फांशीं[१] न देतां दुसरा एखादा माझ्या आब्रूस योग्य अशा रीतीचा मला मारण्याचा हुकूम दिला तर मजवर मोठा उपकार होईल. आणि एवढी कृपा मजवर होण्याजोगे कांहीं तरी गुण माझ्या ठायीं आहेत असें माझी प्रार्थना आपण मान्य केल्यानें मला वाटेल. आपण जी मला मरणाची शिक्षा देत आहां ही केवळ लोकांच्या मनांत भय उत्पन्न करावें ह्या हेतूनें देत आहां. याजकरितां माझा एवढा मनोरथ पूर्ण कराल अशी माझी आशा आहे." ही सुद्धां प्रार्थना वाशिंगूतनाच्यानें मान्य करवेना. मग दुसऱ्या दिवशीं मेजर अंद्रीस चारत्वाच्या दोषावरून फाशीं दिलें. त्याची चाल, वर्त्तणूक व स्वभाव हे फार मनोरंजक होते. त्याला ह्या प्रकारचें मरण आलें ह्याविषयीं अमेरिकेंतील कांहीं लोकांस व इंग्लंदांतील सर्व लोकांस फार वाईट वाटलें. अंद्रीला बेआब्रूचें मरण कशानें प्राप्त झालें, ह्याचा वृत्तांत वाचूं लागलें असतां वाचणारांच्या मनांत साहजिक येतें कीं, अंद्रीचा प्राण वाशिंगूतनानें वांचविला असता तर त्यामध्यें धर्म, न्याय, व भूतदया यांची मर्यादा सुटली नसती. अंद्री भुलथापीनें चार झाला आणि तसें करण्याविषयीं तो अयोग्य उद्देशानें प्रवृत्त झाला नव्हता ही गोष्ट निःसंदेह आहे. तो

---

१ "लांग ऐलंद" येथील लढाईनंतर कप्तान नाथन हेल या नांवाचा चांगला विद्वान, विचारी, आब्रूदार व शूर असा मनुष्य वाशिंगूतनानें शत्रूच्या सेनेचा बातमी कळण्यासाठीं ब्रुक्लिन एथें पाठविला होता तो परत येत असतां त्यास इंग्लिशांनीं पकडून चार असा ठरवून फाशीं दिलें होतें ही गोष्ट वाशिंगूतनाच्या मनांत होती. जे. ती. हेदलो. त. छा.

फाशीं गेला त्या वेळेस त्याची आई आणि तिघी बहिणी इंग्लंदांत जिवंत होत्या. अंद्रीविषयीं त्यांबरोबर सर्व लोकांस वाईट वाटलें व त्याच्या शौर्याच्या व माणुसकीच्या वर्त्तणुकेविषयीं सर्व लोक आश्चर्य दर्शवीत होते. ब्रितिश सरकारानें त्या बायकांची संस्था चांगली यथायोग्य करून दिली. हें युद्ध समाप्तीस गेल्यावर अंद्रीच्या अस्थि अमेरिकेंतून उकरून इंग्लंदास आणिल्या आणि त्या "वेस्त मिनिस्तर अबी" येथें पुरल्या.

सन १७८१ व १७८२ हीं दोन वर्षें मागील वर्षांप्रमाणेंच गेलीं. त्या वर्षांत सोक्षमोक्ष होण्याजोग्या लढाया झाल्या नाहींत व दोन्ही पक्षांतून एकालाही मोठा असा जय मिळाला नाहीं. परंतु अमेरिका व युरोप येथील सर्व गोष्टींचा झोंक अमेरिकेंतील वसाहती स्वतंत्र होण्याच्या कामास अनुकूल होता.

हें युद्ध सुरू झाल्यापासून तों शेवटपर्यंत अमेरिकन लोकांची व्यवस्थापक सभा सर्व कामांत आळस व भित्रेपणा दाखवीत असे व लोकांच्या हिताविषयीं अत्यंत आवश्यक असे उपाय योजण्याविषयीं उशीर लावीत असे यामुळें सैन्यांतील लोक सदोदित त्या सभेच्या नांवानें हाका मारीत होते. असें होतां होतां ते अत्यंत त्रासून जाऊन शेवटीं त्यांच्या मनांत लोकसत्तात्मक राज्यास प्रतिकूल अशीं मतें येऊं लागलीं. व्यवस्थापक सभेच्या कारभारावरून साफ दिसून येतें कीं, लोकसत्तात्मक राज्य चालणें हें फार दुर्घट, त्यास एखादा योग्य व थोर मनुष्य पाहून त्यास "राजा" असें जरी नांव दिलें नाहीं तरी त्यासार-

खें दुसरें नांव देऊन त्याच्या हातीं सर्व कारभार दिल्यावांचून राज्यकारभार व्यवस्थेनें चालणार नाहीं असें शिपाई लोकांस व सरदार लोकांस वाटूं लागलें. सरदार लोकांच्या मनांत तर ही गोष्ट इतकी विंबून गेली कीं, त्यांनीं शेवटीं एकत्र जमून वाशिंगुतनास एक लांब व पसंत पत्र लिहिलें. त्यांत देशाची व मुख्यत्वें करून सैन्याची जी दुर्दशा झाली होती तिजविषयीं विस्तारें मजकूर लिहून शेवटीं असें कलम लिहिलें होतें कीं, "यावरून लोकसत्तात्मक राज्याचा कारभार बरोबर चालत नाहीं. यथायोग्य मनुष्याच्या हाताखालीं सैन्य दिलें असतां त्याच्या हातून कसकशीं कामें होतात हें सर्व लोकांच्या आणि मुख्यत्वें करून सैन्यांतील लोकांच्या दृष्टीस आलेंच असेल. व्यवस्थापक सभा व दुसरा एक मुख्य अधिकारी यांच्या हातून राज्यकारभार चालला असतां त्यांत फार नफा आहे; आणि याविषयीं आपण विचार केला असतां त्या प्रमाणें आपणही मान्य कराल यांत संशय नाहीं. जीं संकटें अनिर्वाच्य अशीं दिसत होतीं त्यांतून ज्याच्या सामर्थ्यें करून आह्मी पार पडून विजयी झालों व ज्याविषयीं सर्व सैन्यामध्यें पूज्यबुद्धि होऊन गेली आहे व ज्यास सर्व लोक थोर असें मानितात तोच पुरुष या स्वस्थकालीं कोणत्या मार्गानें जावें तो मार्ग दाखविण्याविषयीं समर्थ आहे याविषयीं कोणासही संदेह नाहीं. एकाच्या हातीं अधिकार आला असतां तो जुलूम करावयास लागतोच; ही गोष्ट कितीएकांच्या मनामध्यें अशी भिनून गेली आहे कीं, ती काढून

टाकणें हें मोठें दुर्घट काम होऊन राहिलें आहे. याज-करितां जो मुख्य नेमावयाचा त्यास 'राजा' हें नांव न देतां दुसरें तसें कांहीं नांव देणें हें आवश्यक आहे आणि एकदा सर्व व्यवस्था होऊन गेली ह्मणजे त्या मुख्य अधिकाऱ्यास 'राजा' हें नांव दिलें असतां कांहीं चिंता नाहीं. उलटें त्यापासून मोठमोठे नफे होतील असें सिद्ध करितां येईल."

यूनैतेद स्तेत्सच्या इतिहासामध्यें हल्लींची वेळ मोठी आणिबाणीची होती. राज्यक्रांतीसमयीं कारस्थानी लोक व सैनिकलोक हे सर्व लोकांपेक्षां विशेषेंकरून प्रमुख असतात असें कोणीं लिहिलें आहे. राज्यक्रांति होत असतां मुत्सद्दी लोक सामान्यत: प्रसिद्धीस येतात खरे; परंतु अखेरीस त्यांच्यावर सैनिक लोकांचा पगडा पडून त्यांच्याच योगानें राज्यांतील बखेडा मोडून स्वस्थता होते. क्रामवेल व नेपोलिअन यांस राज्याधिकार प्राप्त झाला तो सैन्याच्या योगें करूनच झाला आणि हल्लीं तरी वाशिंगूतनानें राज्य करावें हा बेत सेनेकडूनच निघाला; परंतु हा बेत वाशिंगूतनानेंच मान्य केला नाहीं. याचें कारण आपण राज्याधिकार स्वीकारला असतां पुढें लोकांमध्यें "वाशिंगूतन हा महत्वाकांक्षी आहे" असा आपल्या नांवास बट्टा लागेल या हेतूनें स्वीकारला नाहीं असें नाहीं; तर आपण राज्याधिकार स्वीकारल्यास हल्लींच्या स्थितींत अमेरिकेस यत्किंचितूही लाभ न होतां उलटा नाश मात्र होईल असें त्यानें ताडलें, हेंच तो बेत कबूल न करण्याचें कारण दिसतें.

वाशिंगृतनानें त्या सरदारांच्या पत्राचा जबाव पाठविला त्यांतील मजकूर कीं, "आपण जें पत्र मला पाठविलें तें लक्षपूर्वक सावधान चित्तानें वाचलें आणि त्यांतील तुमचे उद्देश पाहून मी अगदीं चकित झालों. तुह्मीं पत्र लिहून मला कळविलें कीं, सैनिक लोकांचे विचार या प्रकारचे आहेत. त्यास हें वाचून मला असा राग आला व असें दुःख झालें कीं, या युद्धास आरंभ झाल्यापासून मला असा राग कधीं आला नव्हता व असें दुःखही कधींच झालें नव्हतें हें मी वास्तविक सांगतों. त्यांच्या ह्या विचाराचा मला मनापासून राग येतो आणि त्याबाबद त्यांस मी निक्षून सांगतों कीं, असे विचार मनांत आणणें हें अयोग्य होय. तुह्मीं जो हा मजकूर मला कळविला तो या वेळेस मी मनांतच ठेवितों. परंतु याविषयीं सेनेंत पुनः घाटाघाट नजरेस आली तर मला हा मजकूर उघाडीस आणणें अवश्य पडेल.

"तुह्मीं माझें काय पाहिल्यानें तुह्मांस असें पत्र लिहिण्यास धीर आला असेल हें मला कळत नाहीं. तुमच्या उद्देशाप्रमाणें वागलें असतां संकटें प्राप्त होतील. हा तुमचा बेत मला जसा वाईट वाटतो तसा दुसऱ्या कोणास वाईट वाटणार नाहीं; परंतु तुह्मीं पक्कें लक्षांत ठेवावें कीं, सैन्याचें हित करावें ही गोष्ट जशी माझ्या मनांत वागत आहे तशी दुसऱ्या कोणाच्या मनांत वागत नाहीं. प्रसंग आला असतां मी आपलें सर्व वजन व सामर्थ्य त्यांच्या करितां खर्चीन. माझें आपणास हात जोडून एवढें सांगणें आहे कीं, स्वदेशाविष-

यीं व आपणाविषयीं व भविष्य काळच्या स्वकीय संततीविषयीं उत्तम विचार मनांत आणून असले विचार मनांतून अगदीं काढून टाकावे आणि ह्या प्रकारचे विचार कोणीं कोणास सांगू नये हे विनंती.

जार्ज वाशिंगतन."

हेन्रीक्लितन ह्मणून जो इंग्रजाकडील सेनापति होता त्याच्या जाग्यावर गाय कार्लेतन यास नेमलें होतें, तो सन १७८२ च्या मे महिन्यांत न्यूयार्क येथें येऊन पोंचला. त्यानें वाशिंगतनास जीं पहिल्यानेंच पत्रें पाठविलीं त्यांवरूनच स्पष्ट दिसून येत होतें कीं, ब्रितिश सरकारच्या मनांत अमेरिकन लोकांचीं मागणीं कबूल करावयाचीं आहेत. पुढें आगष्ट महिन्यामध्यें त्यानें व्यवस्थापक सभेस कळविलें कीं, पारिस येथें तहाच्या बोलण्याचा उपक्रम जाहला आहे आणि त्यामध्यें यूनैतेद स्तेत्स यांस स्वातंत्र्य आहे ही गोष्ट प्रथमतः मान्य होईल. असा प्रकार असतांही वाशिंगतनाच्या सांगण्यावरून सन १७८३ च्या वसंत ऋतूपर्यंत सर्व सैन्य तसेंच ठेविलें होतें, कोणास रजा दिली नाहीं. आणि त्याच वेळेस बातमी आली कीं, यूनैतेद स्तेत्सच्या स्वातंत्र्याविषयीं जो तहनामा ठरला त्यावर ब्रितिश सरकारची खरोखर सही झाली. आतां सैन्यास रजा देण्याचें कारण नव्हतें; कांकीं सरदारलोकांचें व सैनिकलोकांचें कर्ज व्यवस्थापक सभेकडे फारच राहिलें होतें. आणि त्यांनीं सभेवर उठून बंड करूं नये ह्मणून वाशिंगतनास आपलें सर्व वजन व शाहाणपण हीं खर्चावीं लागलीं.

ग्रंथ संग्रहालय

ज्या दिवशीं लेगसिंग्तन येथें प्रथमतः प्रख्यात लढाई झाली त्या दिवसापासून आठ वर्षांनीं ह्मणजे सन १७८३ च्या एप्रिल महिन्याच्या १९ व्या तारखेस लढाईचें काम बंद झालें. ही खबर सभेनें आपल्या सैन्यास दिली. अमेरिकेमध्यें ब्रितनाच्या ज्या थोड्याशा केवळ वसाहती ह्मणून पूर्वीं नांदत होत्या त्यांनीं आठ वर्षें लढाई करून पृथ्वीच्या पाठीवर लवकरच बलाढ्य होईल असें एक स्वतंत्र राज्य स्थापिलें. इतिहासामध्यें ज्या मोठमोठ्या लढाया लिहिल्या आहेत त्यांजबरोबर ह्या लढाईची तुलना करून पाहिली असतां ही लढाई केवळ क्षुल्लक दिसते. कारण थोड्या लोकांनीं हजारो लोकांचा पराभव करून टाकिला आहे, किती एक पुरुषांनीं पराक्रम केले आहेत किंवा सेनाधिपतींनीं मोठमोठ्या विजातीय युक्ति काढल्या आहेत असें कांहींच या युद्धांत दृष्टीस पडत नाहीं. अमेरिकन लोकांनीं शत्रूपासून आपला बचाव व्हावयाकरितां जपून व धिमेपणानें युद्ध चालविलें होतें. अशा प्रकारच्या युद्धामध्यें धिमेपणा व दृढनिश्चय हे दोन गुण अत्यंत आवश्यक होत व अमेरिकन लोकांच्या अंगीं हे गुण पूर्णत्वें होते. नेपोलिअन व जूलिअस सीझर यांप्रमाणें वाशिंगृतन हा युद्धनिपुण होता असें ह्मणतां येत नाहीं. त्यावेळच्या अमेरिकन लोकांच्या स्थितीस ज्या मोठ्या गुणांची आवश्यकता होती ते गुण वाशिंगृतनामध्यें पूर्ण भरले होते. वाशिंगृतनानें मोठमोठे जय मिळविले आणि लहान लहान पराक्रम करून लोकांस आश्चर्य करावयास

लाविलें खरें. पण ही गोष्ट लक्षांत आणिली पाहिजे कीं, जर अमेरिकन लोकांमध्यें वाशिंगृतनासारिखा मनुष्य नसता तर त्या युद्धामध्यें त्यांचा पराजय होऊन त्यांस बहुधा ब्रितिश लोकांच्या अमलांत राहावें लागलें असतें. अमेरिकेस स्वातंत्र्य प्राप्त जालें हें व्यवस्थापक सभेंतील मंडळीच्या श्रमाचें फल नव्हे; हें शुद्ध वाशिंगृतनाच्या शौर्याचें फल. धिमेपणा व बंदोबस्त ठेवण्याची अक्कल यांचें हें फल होय. वाशिंगृतन नसता तर उगीच वाक्पांडित्य करीत बसणारे व असमर्थ असे जे सभासद लोक त्यांनीं युद्धसामग्रीचा पुरवठा करण्याविषयीं अळस करून आपला नाश करून ठाकिला असता. वाशिंगृतनाचे गुण लोकप्रिय होते किंवा त्याचे विचार फार बारीक होते असें नाहीं खरें; परंतु लोकांचीं मनें हरण करून त्यांवर आपला अंमल बसविण्याची शक्ति, तसेंच आत्मसंयमन व निस्पृहता इत्यादि गुण जसे वाशिंगृतनामध्यें होते तसे थोड्याच लोकांच्या अंगीं आढळतात. वाशिंगृतनाच्या स्वभावाचा हा एक चमत्कार होता कीं, त्याच्या अंगीं जे गुण होते ते सर्व यथायोग्य प्रमाणानें होते त्यांत एकाचें दुसऱ्यापेक्षां प्राबल्य होतें असें अगदीं नाहीं. वाशिंगृतन मोठा व्यवस्थित असे व त्याच्या गुणांच्या योगानें अमेरिकेंतील सैन्यावर त्याचा अंमल बराबर असे. वाशिंगृतन सेनापति असतां तो सैन्यांत व्यवस्था राखण्याकरितां जे हुकूम रोज देई त्यांची बारनिशी आहे, तिजवरून हा सैन्यांत किती कडक अमल राखी व ज्या हेतूनें

लढाई आरंभिली होती त्यास प्रतिबंधक गोष्टी शिपाई लोकांनीं करूं नयेत याविषयीं तो किती दक्षता बाळगी हें कळून येतें. या रोजनिशीच्या पुस्तकांतून आह्मी कांहीं कलमें उतरून घेतों त्यांवरून वाशिंगूतन किती युद्धकुशल होता हें आमच्या वाचणारांच्या ध्यानांत येईल. सन १७७५ च्या नवंबराच्या पांचव्या तारिखेस वाशिंगूतनानें येणें प्रमाणें जाहीर खबर दिली. "आमच्या ऐकण्यांत आलें आहे कीं, आपल्या सैन्यांतील लोकांनीं पोपाचें चित्र जाळण्याची जी पोरकळ व उपहासास्पद अशी रूढी आहे तिजप्रमाणें वर्त्तन करण्याचा निश्चय केला आहे. पण या प्रसंगीं ही गोष्ट केली असतां केवढे दुःखावह परिणाम होतील हें आमच्या सैन्यांतील शिपायांस व सरदारांस कळत नाहीं ही केवढी आश्चर्याची गोष्ट आहे! अमेरिका देशाचें स्वातंत्र्य व संरक्षण करणें हा जो महान उद्देश तो सिद्धीस नेण्याकरितां आपण कानडचा प्रांतांतील लोकांचें आर्जव करून त्यांपासून साह्य मिळविलें आहे त्यांत ते आतां आपल्या बंधुवर्गाप्रमाणें झाले आहेत. अशी गोष्ट असतां पोपाचें चित्र जाळून यांस संकटसमयीं त्या लोकांच्या धर्माची निंदा करणें हें अत्यंत अयोग्य कृत्य आहे. याजकरितां हें काम कोणीं करूं नये व जो करील त्यास निःसंशय दंड होईल. कानडचा प्रांतांत थोडचा दिवसांमागें जे आपणास जय मिळाले ते सर्व तेथील लोकांच्या सहायानें मिळाले त्या अर्थीं त्या लोकांस तिलमात्र सुद्धां राग येण्याजोगें काम आपल्या हातून न होऊं

देतां त्यांचा प्रसिद्धपणें आभार मानावा हीच गोष्ट आपणांस उचित होय."

सन १७७६ च्या आगष्ट महिन्याच्या ३ ऱ्या तारिखेस शिपाई लोकांस देवळांत जाण्याचा अवकाश सांपडावा आणि त्यांना विसावा असावा ह्मणून वाशिंगतनानें त्यांस आदितवारीं काम सांगण्याचें सोडलें. कधीं तसाच प्रसंग आला तर मात्र सांगत असे. त्यास कोणी सांगितलें कीं, निष्कारणी शपथा करावयाच्या व एकमेकांस भलत्या शिव्या द्यावयाच्या अशा शिपाईलोकांत फार वाईट चाली पडल्या आहेत. तें ऐकून त्यास फार वाईट वाटलें त्यानें शिपायांच्या बायकांस सांगितलें कीं, "तुह्मी याचा पक्का बंदोबस्त करा" आणि सांगितलें कीं, "विचार करा कीं, याप्रमाणें मूर्खपणानें व अधर्मानें आपण चालूं तर ईश्वर कधीं आपणांस आशीर्वाद देणार नाहीं आणि जर तुह्मी ह्मणाल कीं, तुमची योग्यता मोठी आहे व तुह्मी बुद्धिमान आहां तर तुह्मी ईश्वराच्या आशीर्वादाचा तिरस्कार केल्यानें तुमच्या योग्यतेला कलंक लागेल."

सप्तंबर महिन्याच्या २० व्या तारिखेस असा हुकूम केला कीं, "आपणांवर शत्रूचा हल्ला आला असतां सैन्यांतून जो पळून जाईल त्यास तत्क्षणीं गोळी घालून मारावें." सर्व कामदारांस अशी परवानगी दिली आणि ह्मणाला "जे शूर लोक आहेत त्यांनीं मूर्ख व गांडू लोकांच्या संग्रामांतून पळून जाऊं नये व अपकीर्ति करून घेऊं नये." सन १७७७ च्या नवंबर महिन्याच्या २२ व्या तारिखेस वाशिंगतनानें सांगितलें कीं, "नऊ

वाजतां बिन कमावलेल्या कातड्याचे उत्तम जोडे करून आणील त्याला दाहा दाळर[१] इनाम मिळतील." आणि कातडेवाल्यांस सांगितलें कीं, "तुह्मी जे लोक जोडे करावयास लागतील त्यांस कातडीं पुरवावीं." व त्या दिवशीं सैन्यावर देखरेख ठेवणारा जो सरदार होता त्यास हुकूम दिला कीं, "चांगला जोडा कोणीं केला याचें ठरवून तुह्मीं त्यास बक्षीस देण्याचें ठरवावें."

सन १७८३ च्या एप्रिल महिन्यांत लाफेती यास वाशिंग्‌तनानें पत्र लिहिलें आहे, त्यावरून तह झाल्यानंतर वाशिंग्‌तनाच्या मनांत काय होतें हें समजून येतें. तो लिहितो, "आतां आह्मी स्वतंत्र झालों यास्तव आम्हांस आतां राज्यकारभार कोणत्या रीतीनें करावा हें शिकलें पाहिजे. इतके दिवसपर्यंत आह्मी इंग्रज लोकांत मोडत होतों; परंतु आतां आह्मी निराळे स्वतंत्र लोक झालों. आणि आह्मांस नांव लौकिक यापुढें मिळवणें आहे. आह्मी पुढें कोणत्या योग्यतेस येऊं याचा निर्णय कालगतीनें आपोआप होईल. ज्यांच्या हातुन मौर्ख्याचें काम कदापि व्हावयाचें नाहीं असे शाहणे व विचारी पुरुष सर्वांच्या कल्याणार्थ जो राज्यक्रम चालू करण्यास सांगतील तो कोणी न मानून गांवोगांवचे लोक आपापल्या कल्याणाकडे लक्ष देऊं लागतील; आणि सर्वांचें कल्याण होईल किंवा नाहीं याचा विचार न करितां ज्या गोष्टीनें

---

१ दाळर ह्मणून एक नाणें होतें, त्याची किंमत सुमारें सव्वादोन रुपये होती.

आपलें हित होईल तीच करण्याविषयीं ते झटतील असा संभव मला दिसतो. यामुळें आह्मी राज्य करण्यांत निपुण होण्याच्या पूर्वीं आमच्या हातून बहुत चुका होतील."

सन १७८३ च्या उन्हाळ्यांत वाशिंगूतन उत्तरेकडील प्रदेशांत प्रवासास गेला होता, त्या वेळेस त्याचे मनांत असा बेत आला कीं, हदसनचें आखात व महासरोवरें यांत कालवा बांधावा. तेथून परत आल्यावर तो फ्रिन्स तौन येथील लोकांच्या सभेस गेला होता, तेथें त्या सभेनें त्याचा फार चांगला आदरसत्कार केला. तारीख १८ माहे आक्तोबर रोजीं सैन्यास रजा दिली, वाशिंगूतनानें तारीख २ माहे नवंबर रोजीं सभेशीं संभाषण केलें आणि न्यूयार्क येथें तारीख ४ माहे दिसेंबर रोजीं आपल्या सरदारांसहवर्तमान भोजन केलें. तारीख २३ रोजीं सभेस त्यानें आपल्या कामाबद्दल राजीनामा दिला. या राजीनाम्याबरोबर जें पत्र त्यानें सभेस पाठविलें होतें त्यांत हें पुढील वाक्य होतें. "जें काम तुह्मीं मला सांगितलें होतें तें मीं समाप्त केलें व हा माझा तुह्मांला शेवटचा सलाम असो. इतके दिवस मी तुमच्या आज्ञेंत वागलों. आतां हा माझा राजीनामा मान्य करावा." दुसऱ्या दिवशीं तो अनापोलीस येथून निघून मौंतवर्नन येथें गेला. गेल्या आठ वर्षांमध्यें तो मौंतवर्नन येथें फक्त दोन वेळ गेला होता.

## वाशिंगूतन सरकारी काम सोडून आपल्या वतन-वाडींत जाऊन राहिला.

वाशिंगूतन यास अतिशय प्रिय जो कृषिकर्माचा धंदा त्यांत पडण्याकरितां पुनः घरीं येऊन त्या कामांत तो आपला काळ क्रमूं लागला. या समयीं याचें वय ५९ वर्षांचें होतें. वर सांगितल्या रीतीनें काल घालविण्यांत त्यास फार संतोष वाटत असे. त्यानें आपल्या एका मित्रास पत्र लिहिलें आहे त्यांत तो असें लिहितो कीं, "सर्व गोष्टींत संतोष मानून आमरणांत कालक्रमण करण्याचा मी निश्चय केला आहे."

पुढें वाशिंगूतनानें शेतकी करणें, बाग करणें व रोपें लावणें ह्या कामांत आनंदानें तीन वर्षें घालविलीं. वाशिंगूतनास जी नुकतीच मोठी जागा मिळाली होती ती मिळण्यापूर्वींही कित्येक वर्षें मौंतवर्नन येथें त्याच्या घरीं लोकांचा पाहुणचार फार चांगला होतो अशी प्रसिद्धि झालीच होती, ह्मणून तो विजयी होऊन घरीं आल्यावर पुढें जेव्हां युरोपांतून व अमेरिकेतून मोठे मोठे बडे लोक व साधारण लोक, त्याचे जुने स्नेही व नवे ओळखीचे लोक, मोठमोठे विख्यात ग्रंथकर्ते पुरुष व ग्रंथकर्त्या स्त्रिया व साधारण स्त्रिया इत्यादि नानाप्रकारचे लोक त्याच्या घरीं त्याच्या भेटीस येऊं लागले, तेव्हां त्याच्या घरीं पाहुणचार फारच वाढला आणि त्याच्या बायकोच्या संसार करण्याच्या दक्षतेची पुरती परीक्षा झाली. स्पार्क साहेब असें लिहितो कीं, युद्धाच्या पूर्वीं ज्या वाशिंगूतनाच्या चाली होत्या त्या तो पुढें सरकारी काम सोडून तीन वर्षेंपर्यंत घरगुती

कामें पाहत होता तेव्हांही तशाच होत्या. त्यांत कांहीं फेर पडला नव्हता. तो नेहेमीं अरुणोदयीं आपली फराळाची वेळ होई तोंपर्यंत आपला वेळ विद्याभ्यास, पत्रें लिहिणें व ग्रंथ वाचणें या कामांत घालवीत असे. त्याचा फराळ होतो न होतो तों त्याचा मोतद्दार घोडा तयार करून दाराशीं उभा असे, त्यावर बसून त्या दिवशीं मजुरांनीं व त्यांच्या वरच्या नायकांनीं कोणतीं कामें करावीं तीं सांगण्यासाठीं तो आपल्या शेतांत जात असे. त्याच्या घरीं जे पाहुणे येत त्यांस करमणुकीसाठीं आसमंतात फिरावयाचें असल्यास किंवा त्यांस बरोबर घेऊन जाण्याची खुषी असल्यास त्यांकरितांही घोडे तयार असत. शेतांतून परत येऊन व निकडीचीं कामें करून टाकल्यावर, तो पुनः तीन वाजतां दुपारचे जेवणाचें बोलावणें येई तोंपर्यंत अभ्यास करीत बसे. नंतर बाकीचा वेळ व संध्याकाळच्या चार घटका चार मंडळी त्याजकडे येई त्यांशीं बोलण्याचालण्यांत व कुटुंबांतील मनुष्यांबरोबर करमणूक करण्यांत घालवीत असे आणि रात्रींचे दहा वाजतां निजत असे. कांहीं निकडीचें काम करण्याचा प्रसंग आल्याशिवाय त्याच्या ह्या शिरस्त्यांत अगदीं अंतर पडत नसे. ह्याप्रमाणें मोठ्या शांतपणानें तो कालक्षेप करीत असे. परंतु यांत त्याला लवकरच विघ्न आलें. कारण अमेरिकेंतलें युद्ध मात्र संपलें होतें. पण त्यानंतरच्या पुष्कळ गोष्टी व्हावयाच्या तशाच राहिल्या होत्या. त्या वेळेस आपल्या देशांतील अनेक संस्थानांचा जेणेंकरून एक कट राहील व कोणत्याही संस्थानांतील

ठाणें

लोकांच्या अधिकारास व त्यांच्या हितास कांहीं प्रतिबंध न होईल असा राज्याचा प्रकार स्थापण्याची युक्ति कोणती काढावी याविषयीं त्यास मोठी काळजी पडली होती. "कान्ग्रेस" सभेंतील सभासदांच्या हातीं मोठी नियंतृत्वशक्ति देऊं नये असें सर्व लोकांच्या मनांत होतें. या गोष्टीचा वाईट परिणाम वाशिंगूतनाच्या ध्यानांत येऊन त्यानें आपल्या स्नेह्यांस जीं पत्रें पाठविलीं त्यांत असें निक्षून लिहिलें होतें कीं, आपल्या देशांत एक राजा स्थापून त्याच्या हातीं सर्व अधिकार देणें हें, आजपावेतों आपण ज्यांकरितां इंग्लंदाशीं लढून स्वदेशास स्वातंत्र्य संपादिलें त्या हेतूंचा विचार करितां सर्वथा अयोग्य आहे. याविषयीं त्यानें बहुत कारणेंही लिहून कळविलीं.

शेवटीं कित्येक दिवसपर्यंत घाटाघाटी झाल्यावर सर्व लोक एकमत होऊन त्यांनीं राज्यव्यवस्था कशी करावी यांचा विचार ठरविण्यासाठीं एक मुखत्यारलोकांची मंडळी नेमिली. वर्जिनियांतील लोकांनीं त्या मंडळीमध्यें आपल्यास संस्थानाचे सात मुखत्यार नेमिले त्यांत वाशिंगूतनास मुख्य नेमिलें. ही नेमणूक मान्य करण्याची वाशिंगूतनाची खुषी नव्हती तरी त्यानें सर्व लोकांच्या आग्रहास्तव ती जागा पतकरली. त्या जाग्यावर जाण्याचें मान्य करतांक्षणींच त्या सभेंतील सभासद ह्मणून आपणास जीं कामें केलीं पाहिजेत तीं कामें इतिहासांच्या अनुसारानें आपणास चांगलीं करतां यावीं ह्मणून त्यानें तयारी चालविली. त्याच्या मनांत आपल्या देशामध्यें ज्या प्रकारचा ऐक्यसंबंध स्थापला

होता त्याप्रकारचे ऐक्यसंबंध जेथें जेथें प्राचीन व अर्वाचीन इतिहासांमध्यें आढळतात त्यात्या स्थळांविषयीं चांगला शोध करावयाचा होता ह्मणून ज्याज्या गोष्टींची माहिती असल्यावांचून आपणास त्या सभेचीं कार्यें करतां यावयाचीं नाहींत त्यांची व ज्याज्या गोष्टींचे तेथें हरवक्त प्रसंग येणार त्यांची माहिती करून घेण्यासाठीं सर्व लोकसंमत जे राज्यप्रकरणी सर्वोत्कृष्ट ग्रंथ होते ते त्यानें वाचले व त्यांचा सारांशही उतरून काढला. याप्रमाणें तयारी करून तो फिलदेल्फिया शहरास चालता झाला. मग इसवी सन १७८७ मध्यें मे महिन्याच्या १४ व्या तारखेस ती सभा स्थापित झाली. त्यावेळेस तिजमध्यें ऱ्होदबेटचें संस्थान खेरीजकरून बाकीच्या सर्व संस्थानांतील मुखत्यार हजर होते. मग त्या सर्व मुखत्यारांनीं एकमत होऊन वाशिंगृतनास आपला अध्यक्ष नेमिलें. पुढें सुमारें चार महिनेपर्यंत एका ठिकाणीं जमून त्या सभासदांनीं विचार करून अमेरिकेंतील यूनैतेद स्तेत्समध्यें अमुक प्रकारचा लोकसत्ताक राज्याधिकार असावा असें ठरविलें व तो प्रकार त्यांनीं सर्व लोकांस जाहीर केला. त्या वेळेस सर्व संस्थानांतील लोकांनींही मोठ्या संतोषानें तो राज्यप्रकार स्वीकारिला. त्या वेळेस वेंजामिन फ्रांक्लिन नामें त्या सभेंतील एक सभासद होता त्यानें आपलें मत असें दिलें कीं, या राज्यरीतीपेक्षां चांगली दुसरी राज्यरीति कोणाच्यानें काढवेल अशी मला आशा नाहीं व हीच राज्यरीति इतर सर्व राज्यरीतींहून उत्कृष्ट नसेल अशीही माझी खात्री नाहीं. ह्मणून आतां जी रीति ठरली

आहे ती मला मान्य आहे व माझ्या बुद्धीनें हिजमध्यें जे मला दोष वाटतात ते सर्वांच्या कल्याणाचे आहेत ह्मणून ते आहेत असें मी समजत नाहीं. वाशिंगृतनानेंही आपलें मत अगदीं त्यासारिखेंच दिलें. तो ह्मणाला कीं, सर्व गोष्टींचा विचार करून पाहिला असतां सांप्रतकाळीं हाच प्रकार सर्वोत्कृष्ट आहे. नंतर सभेनें सर्व संस्थानांतील लोकांकडून, हा राज्याचा प्रकार आह्मांस मान्य आहे असें कबूल करवून त्यांच्या सह्या घेतल्या. नंतर त्या सभेनें एक ठराव केला. त्यांत असें लिहिलें होतें कीं, सन १७८९ दामध्यें फेब्रुआरी महिन्याच्या पहिल्या बुधवारीं सर्व लोकांनीं मिळून सभेंतील अध्यक्ष निवडणारी एक मंडळी नेमावी व मार्च महिन्याच्या पहिल्या बुधवारीं त्या नेमलेल्या मंडळीनें जमून एक विचारानें अध्यक्ष नेमावा. नेमणुकीच्या दिवशीं सर्व लोकांनीं अध्यक्ष नेमणारे ह्मणून जे जे लोक ठरविले होते त्या सर्वांनीं "आज आह्मीं आह्मां सर्वांच्या मतानें जार्ज वाशिंगृतन ह्यास यूनैतेद स्तेतचा प्रथम अध्यक्ष नेमिला," असें सर्व लोकांस जाहीर करून आपलें काम बजाविलें. नंतर १७८९ या वर्षी मार्च महिन्याच्या १६ व्या तारखेस वाशिंगृतन मौंतवर्नन एथून न्यूयार्क शहरास जावयास निघाला, तेव्हां त्याबरोबर हजार लोक गेले. यामुळें त्या वेळेस एखाद्या मोठ्या विजयी राजाची स्वारी निघते तसा तो समाज दिसूं लागला. साऱ्या रस्त्यांमध्यें चोहोंकडे लोकचलोक होऊन गेले होते. ज्याज्या शहरांत तो गेला त्यात्या शहरांतील लोकांनीं घंटांचे

गजर व तोफांची सरवत सुरू केली. याप्रमाणें मोठ्या थाटमाटानें तो मार्च महिन्याच्या २३ व्या तारखेस न्यूयार्क शहरांत जाऊन पोंचला. आणि ३० व्या तारखेस कायद्यावरहुकूम शपथ घेऊन आपल्या कामास लागला. हा अधिकार वाशिंगूतनास त्याच्या ५७ व्या वर्षी प्राप्त झाला.

वाशिंगूतन अध्यक्ष जाल्यावर त्यानें जीं कामें केलीं त्यांविषयीं त्यास ह्या सभेंतील अध्यक्षाची जागा मिळतांक्षणींच त्या राज्यांतील निरनिराळ्या खात्यांच्या मुख्यांस त्यानें हुकूम पाठविले कीं, आह्मांस तुमच्या खात्यांतील सर्व कामांची तपशीलवार एक मोठी याद लिहून पाठवावी. त्या यादी वाशिंगूतनानें लक्ष्यपूर्वक वाचून आपल्या हातांत ठेविल्या. आणि युद्ध तहकूब करण्याविषयीं जो ठराव झाला होता त्या ठरावापासून आपणास अध्यक्षाचें काम मिळे तोंपर्यंत जो काळ गेला होता त्या काळचे राज्यप्रकरणी लेख चांगले वाचून त्यांचा सारांशही आपणापाशीं उतरून घेतला. ह्याप्रमाणें ज्या राज्यावर त्यास अध्यक्ष नेमिलें होतें त्या राज्यांतील लोकांची स्थिति त्यानें चांगली माहीत करून घेतली. पूर्वी लिहिलेंच आहे कीं, वाशिंगूतनास सेनापतीचें काम होतें तेव्हां तो आपल्या घरगुती कामांची देखरेख मोठ्या सावधगिरीनें ठेवीत असे. तसेंच यावेळेसही त्यास पुष्कळच काम पडत असे तरी तो पहिल्याप्रमाणेंच देखरेख ठेवण्यांत अंतर करीत नसे. त्यानें मौंतवर्नन एथें जे कामदार नेमिले होते त्यांस नमुने घालून दिले होते त्यांप्रमाणें त्यास ते

कामदारलोक दर आठवड्यास हकीकत लिहून पाठवीत असत. ह्याप्रमाणें तो मौंतवर्नन एथील कच्चा मजकूर समजून घेत असे व आठवड्यांतून एकदां तो तेथील मुखत्यारांस त्यांच्या पत्रांचीं उत्तरें व हुकूम पाठवीत असे. तो पत्र लिहिण्याच्या कामांत बेतबात ठेवण्याविषयीं इतका जपत असे कीं, तो प्रथमतः पत्राचा मसुदा करून मग तें नीटनेटकें लिहून पाठवीत असे. वाशिंगृतन शेतकीच्या कामांत पराकाष्ठेचें लक्ष्य देत असे याविषयीं दुसरें एक प्रमाण असें आहे कीं, तो राज्यांतील मुख्य अधिकारी असतां युरोपांत व अमेरिकेंत शेतकीच्या कामांत जे लोक हुशार ह्मणून प्रसिद्ध होते त्यांस आपले विचार समजून देण्याकरितां व त्यांचे विचार समजून घेण्याकरितां त्यांशीं पत्रव्यवहार चालवीत असे.

वाशिंगृतनाच्या दरबारांत लोकांनीं कोणत्या वेळेस भेटावयास यावें ह्याविषयीं कांहीं नियम ठरविला नव्हता, त्यामुळें असें झालें कीं, ज्यावेळेस पाहिजे त्यावेळेस सकाळपासून संध्याकाळपर्यंत लोक त्याजकडे येत असत व त्यांचें त्यास आगतस्वागत करावें लागे. ही अव्यवस्था बंद करण्यासाठीं असा नियम ठरविला कीं, वाशिंगृतनाची भेट ज्या लोकांस घ्यावयाची असेल त्यांनीं मंगळवारीं मात्र तीन वाजल्यापासून पुढें त्यास भेटावें. आणि वाशिंगृतनाच्या बायकोस ज्यांस भेटावयाचें असेल त्यांनीं शुक्रवारीं तीनपासून पांच वाजतांपर्यंत तीस भेटावें. या नेमलेल्या वेळेस वाशिंगृतन त्या दरबारांत हजर असे. तो कोणाच्याही घरचें जेव-

णाचें आमंत्रण घेत नसे. आपल्या पंक्तीस सरकारी कामगार लोकांस, घरगुती इष्टमित्रांस व ओळखीच्या लोकांस आदितवार खेरीज करून दररोज बोलावीत असे. आदितवारच्या दिवशीं सकाळींच बेतानें देवळांत जात असे आणि आपल्या कुटुंबांतील माणसांशीं व अगदीं घरोब्यांतील असे जे आपले जिवलग मित्र असतील त्यांशीं बोलण्याचालण्यामध्यें संध्याकाळचा वेळ घालवीत असे. त्यास मुख्याधिकाऱ्याची जागा मिळाली त्याच वर्षीं त्याची आई मरण पावली. ती ब्यायशी वर्षांची वृद्ध होती. वाशिंगूतन प्रेसिदेंत नेमल्यावर प्रथमच जी कान्ग्रेस सभा बसली तिनें राज्यांतील कांहीं खात्यांची व्यवस्था केली. वाशिंगूतन त्या सभेंतील मुख्याधिकारी होता ह्मणून त्या खात्यांतील मुख्य कामगारांस हुद्दे दिले. तामस जेफर्सन नामें एक विख्यात गृहस्थ होता त्यास परराष्ट्रखात्याचा मुख्य व स्तेत सेक्रेतरी नेमिलें. आलेक्झांदर हामिल्तन यास खजिन्याचे चिटनीस नेमिलें. हा आलेक्झांदर हामिल्तन तामस जेफरसन याच्या लोकसत्तात्मक राज्याच्या पद्धतीस अनुकूल नव्हता ह्मणून त्यास राज्यकारभारांतील एखादें प्रमुख काम न सांगतां या चिटणिशीवरच नेमिलें. नाक्स साहेबास लष्करी खात्याचा चिटणीस नेमिलें. एद्मंद रांदाल्फ साहेबास अतर्नी जनरल ह्मणजे मुख्य मुतालिक ह्याचा अधिकार दिला. आणि जान जे या साहेबास मुख्य न्यायाधिशाचें काम दिलें. याप्रमाणें नेमणुका केल्या, तेव्हां वाशिंगूतनाचें चातुर्य व निष्पक्षपात हीं सर्व लोकांच्या ध्यानांत येऊन त्या-

ची चोहोंकडे मोठी कीर्ति झाली. वाशिंगृतन मुख्य अधिकारी होता तोंपर्यंत जीं जीं कृत्यें झालीं त्या सर्वांचें ह्या ग्रंथांत वर्णन करणें अगदीं अशक्य आहे; पण आह्मी त्याविषयीं एवढेंच लिहितों कीं, त्यास हा अधिकार मिळे तोंपर्यंत जे त्याच्या मनांत बुद्धि व सचवटी हे असाधारण गुण होते, तेच गुण पुढें त्यास अधिकार मिळून त्याच्या हातून जीं मोठमोठीं कामें होत असत, त्यांत देखील ढळढळीत दिसून येत होते. त्याच्या मंत्री लोकांमध्यें बहुत करून दोन पक्ष होत असत. एका पक्षाच्या लोकांचें ह्मणणें, निरनिराळ्या संस्थानांचा अधिकार कमी करून राज्यांतील मुख्यमुख्य अधिकारी लोकांचा अधिकार वाढवावा असें होतें; व दुसऱ्या पक्षाच्या लोकांचें ह्मणणें, ज्या ज्या ठिकाणीं दरबारें आहेत त्या त्या ठिकाणच्या दरबारांचा व राज्य चालविण्याचे कायदे ठरविणारांनीं निरनिराळ्या शहरांतील लोकांचा अधिकार वाढवावा असें होतें. पण वाशिंगृतनानें त्या विरुद्धपक्षाच्या मंडळींमध्यें कोणाचें कोणावर प्राबल्य न होऊं देतां समता राखिली होती, ह्यावरून त्याची हुशारी जितकी लोकांस दिसून आली तितकी दुसऱ्या कोणत्याही गोष्टीनें आली नाहीं. हेंदर्सन साहेब पहिल्या पक्षांतील लोकांचा व जेफर्सन हा दुसऱ्या पक्षांतील लोकांचा असे अग्रगण्य होते. वाशिंगृतनाच्या मनाचा कल पहिल्या पक्षाकडे होता. पण तो सभेंतील मुख्याधिकारी होता ह्मणून तो कोणाच्याही पक्षाकडे आपलें आंग न दाखवितां त्या दोन्ही विरु-

द्वपक्षांतील लोकांचें होईल तितकें ऐक्य करून जें काम करणें तें करीत असे; तथापि त्या पक्षांमध्यें दिवसानुदिवस मतभेद इतका अधिक होत चालला कीं, तो वंद करणें मोठें अशक्य वाटूं लागलें आणि वाशिंगृतनाच्या अधिकाराची मुदत संपत आली होती, ह्मणून या मतभेदापासून काय काय भयंकर परिणाम होतील कोण जाणे, असें सर्व लोकांस मोठें भय प्राप्त झालें. कारण त्या वेळेस राज्याचा बंदोवस्त चांगला झाला नव्हता त्यामुळें त्या लोकांच्या कज्जापासून त्या समयीं राज्यांत अनर्थ होण्याचा संभव होता. तर तो अनर्थ टाळण्यासाठीं वाशिंगृतनास पुनः चार वर्षेपर्यंत प्रेसिदंत नेमावें एवढाच उपाय दिसत होता; ह्मणून वाशिंगृतनाच्या सर्व स्नेह्यांनीं व मंत्री लोकांनीं उत्कंठापूर्वक त्याची अशी प्रार्थना केली कीं, सर्व लोकांनीं पुनः अध्यक्षाचा अधिकार आपणास द्यावा असें ठरविलें असतां आपण तो अधिकार पतकरण्याविषयीं अगदीं अनमान करूं नये. शेवटीं मोठ्या जुलमानें वाशिंगृतनानें त्यांची हीही प्रार्थना कबूल केली. आणि पुनः त्या अधिकारावर आपली नेमणूक करूं दिली. वाशिंगृतनास तो अधिकार पुनः मिळाला त्याच वेळेस फ्रान्स देशांत राज्यक्रांतीची अगदीं धामधूम चालली होती. त्यासमयीं युरोपांतील युद्धांमध्यें यूनैतेद स्तेत्सचा संवंध अगदीं राहूं नये ह्मणून वाशिंगृतनास मोठी विचारशक्ति व चातुर्य हीं लढवावीं लागलीं. जरी त्यानें मोठ्या शौर्यानें आपल्या देशांतील लोकांस त्या युद्धाच्या कामांत अगदीं पडूं

दिलें नाहीं तरी तें चालू असतां कांहीं लोकांस जोर आला व त्यामुळें जेफर्सनाच्या पक्षास जोर येत चालला. पुढें वाशिंगूतनाच्या कारकीर्दीच्या शेवटीं त्या दोहोंपक्षांमध्यें एवढा आवेशाचा कज्जा लागला कीं, त्यामध्यें सर्व लोकांच्या मनाचा क्षोभ होऊन त्यांनीं त्याची देखील पुष्कळ निंदा केली व त्यास शब्द लावला.

ह्या वेळेस राज्यकारभारधुरंधर अशा मुत्सद्दी लोकांत राज्यप्रकरणी मतांमध्यें इतके विरोध येऊं लागले कीं, वाशिंगूतन हा प्रेसिदेंताचा अधिकार पुनः पतकरील तर लोकांचें फार बरें होईल, अशी कित्येकांस मोठी उत्कंठा झाली होती. पण त्यानें तें काम अतःपर करावयाचें नाहीं असा निश्चय केला ह्मणून सन १७९७ त नवा प्रेसिदेंत नेमण्याच्या वेळेस हेंदर्सन साहेबाच्या पक्षाचा जान आदम्स या नांवाचा एक गृहस्थ होता त्याजविषयीं बहुमत पडल्यावरून त्यास मुख्य प्रेसिदेंताची जागा मिळाली. त्याच्यापेक्षां कांहीं कमी मतें जेफर्सनाविषयीं दिलीं होतीं ह्मणून त्यास वाइस प्रेसिदेंत नेमिलें. जान आदम्स यास मार्च महिन्याच्या चवथ्या तारखेस तो अधिकार प्राप्त झाला. नंतर तो समारंभ झाल्यावर लागलाच वाशिंगूतन मौंतवर्नन एथें निघून गेला. शेतकीच्या कामांत त्यास मोठा आनंद वाटत असे ह्मणून त्यानें तेथें गेल्यावर अडीच वर्षे पर्यंत त्या शांतपणाच्या उद्योगांत आयुष्य घालविलें. फ्रान्स देशाशीं युद्ध होण्याचा संभव आहे अशी आवई उडाली तेव्हां त्यास मुख्य सेनापति नेमलें

होतें. पण त्यास रणांगणांत जाण्याचा प्रसंग आला नाहीं. आमरणांत त्याची शरीरप्रकृति फार चांगली होती. आणि तो पुष्कळ दिवसपर्यंत वांचेल असें सर्व लोकांस वाटत होतें; परंतु १७९७ वा-मध्यें दिसेंबर महिन्याच्या बाराव्या तारखेस तो नेहमी-प्रमाणें चाकर लोकांस आज्ञा करण्यास गेला होता. मग तो घोड्यावर बसून घरीं येतांना वाटेनें त्यास पावसाची मोठी झड लागली. तो घरीं येऊन पोहोंचे तोंपर्यंत त्याची मान भिजून चिंब झाली. आणि त्याच्या केसांच्या झुबक्यामध्यें पावसाचें पाणी सांचलें होतें त्यामुळें दुसऱ्या दिवशीं त्यास पडसें पुष्कळ आलें. पण त्यापासून मोठा धोका होईल असें त्यास वाटलें नाहीं, ह्मणून तो नेहमीच्या रीतीप्रमाणें वर्त्तमानपत्रें वाचीत बसला आणि अत्यंत उल्हासवृत्ति दिसत होता. त्यास आपण पडशाचें काहीं औषध घ्या असें त्याचा कारभारी, मि. लीयर यानें सांगितलें तेव्हां तो बोलला "छि:, मी पडशावर कांहीं औषध घेत नसतों. त्यांत काय आहे ? तें जसें आलें तसेंच जाईल." दुसरे दिवशीं पाहटेस त्याची प्रकृति अधिक बिघडली. त्यास श्वासोच्छ्वास टाकण्यास अडचण पडूं लागली आणि त्याच्यानें बोलवेनासें झालें. आपल्या कामावर देखरेख ठेवणाऱ्या ओव-र्सियराकडून त्यानें आपलें रक्त काढविलें आणि क्रेक नांवाचा एक वैद्य त्याचा जुना मित्र तेथून चार पांच कोसांवर आलेक्झांड्रिया येथें राहत होता त्यास बोला-वणें पाठविलें. दरम्याम दुसरे वैद्य येऊन त्यांनीं त्याच्या

रोगावर पुष्कळ उपाय केले. पण त्यास गुण पडला नाहीं. पाहाटेचे चार वाजल्यावर कांहीं वेळानें मेजांतील पेटीमध्यें दोन मृत्युपत्रें लिहून ठेवलीं होतीं तीं त्यानें आपल्या बायकोस आणावयास सांगितलीं. त्यानें त्या पत्रांकडे पाहून त्यांपैकीं एक तिच्या जवळ दिलें आणि तीस सांगितलें-कीं, तें निरुपयोगी आहे. त्याच्या पाठीमागुन दुसरें लिहून तें मीं रद्द केलें आहे, ह्मणून तूं तें नेऊन जाळून टाक. मग तिनें तें जाळून टाकलें. नंतर थोडया वेळानें तो वीयस लीयर नामें गृहस्थ त्याच्या कामाची देखरेख ठेवणारा व त्याचा चिटणीस होता त्याशीं तो प्रयासानें बोलला कीं, "मला वाटतें कीं, मी आतां जातों. माझ्यानें आतां फारवेळ श्वासोच्छ्वास टाकवत नाहीं. हा रोग माझ्या प्राणावरचा आहे असें मला पहिल्यापासूनच वाटत होतें. तुह्मी माझीं मागलीं लष्करी कामांतील कागदपत्रें व हिशेबाचे कागद व दुसरीं पुस्तकें व्यवस्थेनें ठेवा. व राली-साहेबानें जीं माझीं पत्रें लिहिण्यास आरंभ केला आहे, तीं सारीं लिहूं नको असें त्यास सांगा." इतक्यांत तो दाक्तर क्रेक साहेबास ह्मणाला कीं, "वैद्यबावा, मी मोठ्या प्रयासानें मरत आहें, पण त्याचें मला अगदीं भय वाटत नाहीं." कांहीं वेळपर्यंत त्यास चैन पडेनासें झालें, चुळबुळ सुटली आणि वारंवार "किती तास वाजले" असें तो विचारूं लागला. रात्रीं सुमारें दहा वाजतां तो लियर साहेबास मोठ्या प्रयासानें ह्मणाला, "माझा प्राण चालला आहे. मला चांगल्या

योग्य रीतीनें पुरा आणि मरून तीन दिवस लोटल्यावांचून मला थडग्यांत ठेवूं नका." रात्रीं अकरा वाजतां त्यानें हातपाय झाडल्यावांचून एकाएकी प्राण सोडला. त्याची बायको बिछान्याच्या पायथ्याशीं बसली होती तिनें विचारिलें कीं, "ते गेले कायहो?" "होय गेले" असें तिला कोणी उत्तर दिल्यावर ती बोलली, "जें झालें तें चांगलेंच झालें. आतां सर्व गोष्टी संपल्या. मीही लवकरच त्यांचें अनुसरण करीन. आतां मला कांहीं दु:खाचे प्रसंग उरले नाहींत." या प्रमाणें जार्ज वाशिंगूतन हा १७९९ त दिसेंबरच्या १५ व्या तारखेस मरण पावला. त्या वेळेस त्याचें वय ६७ वर्षांचें होतें. मग अठराव्या तारखेस मौंतवर्नन एथें त्याला पुरलें. त्याच्या मरणाची बातमी लागलीच साऱ्या अमेरिकेंत व युरोपांत चोहोंकडे पसरली. आणि सर्व ठिकाणच्या लोकांस त्याच्या सर्व कृतींचें स्मरण होऊन परस्परांच्या इर्ष्येनें त्यांनीं त्याचें अधिकाधिक गुणवर्णन केलें. त्यानें मरणसमयीं एक गोष्ट केली, ती येथें लिहिली असतां आमच्या वाचणारांस मोठा संतोष होईल. त्यानें हपशी देशांतील पुष्कळ गुलाम विकत घेऊन आपल्या वतनावर कामास लाविले होते, असें आह्मीं पूर्वींच लिहिलें आहे. त्यांपैकीं कांहीं स्वतः त्यानें विकत घेतलेले होते व कांहीं त्याच्या बायकोनें विकत घेतलेले होते. अमेरिका खंडास स्वतंत्र करणारा जो हा एवढा उदार विचारी वाशिंगूतन त्यानें जन्मभर दासांच्या कबज्याच्या कामांत वर्जिनिया संस्थानांतील इतर गृहस्थांपेक्षां कांहींच अधिक दया

दाखविली नाहीं हें खरें. परंतु मरणसमयीं त्यानें आपल्या मृत्युपत्रांत त्या गरीब बापड्यांस हितावह अशा चार गोष्टी लिहून ठेवल्या होत्या. त्यांत असें होतें कीं, "माझे खासगत जितके दास आहेत तितक्यांस माझी बायको मेल्यावर स्वतंत्र करावें. जोंपर्यंत ती कायम आहे तोंपर्यंत त्यांनीं पूर्वीप्रमाणें चाकरी केली पाहिजे. कारण माझ्या पाठीमागें माझ्या खासगत दासांस दुःख राहूं नये व त्यांनीं स्वतंत्रतेनें वागावें अशी माझी फार इच्छा आहे. माझ्या बायकोच्या हयातीपर्यंत तिच्या दासांस स्वतंत्र करणें माझ्या हातीं नाहीं आणि त्यांच्या व ह्यांच्या परस्पर सोयरिका झाल्या असतां त्यांपासून पुढें त्यांस मोठमोठ्या दुर्घट अडचणी प्राप्त होतील. त्याची बायको मेल्यावर त्याचे जे कोणी वारस राहिले होते त्यांस सरकारानें बोलावून आणून वाशिंगूतनाच्या मृत्युपत्रांत दासांस सोडून देण्याविषयीं जें कलम लिहिलें होतें तें पाहण्याविषयीं गंभीरपणानें आज्ञा केली व त्यांजकडून कांहीं उपेक्षा व विलंब न होऊं देतां त्या लेखांत लिहिलेले वाशिंगूतनाचे एकंदर सर्व हेतु, धर्मसंबंधी कर्त्तव्यकर्माप्रमाणें पूर्ण नजरेनें शेवटास नेवविले. मोकळे केलेल्या दासांमध्यें जे कोणी अत्यंत वृद्ध आणि उदरनिर्वाह करण्यास असमर्थ असे होते त्यांचें आमरणांत पोषण वाशिंगूतनाच्या वारसांनीं करावें आणि त्यांस सुखी राखावें व त्या दासांस मुक्त करतेसमयीं जितक्या मुलांचे आईबाप जिवंत नसतील व जरी जिवंत असले तरी ज्या मुलांचें पोषण

करण्यास असमर्थ अथवा नाखुषी असतील तीं सर्व मुलें पंचवीस वर्षांचीं होत तोंपर्यंत त्यांस सरकारांनीं आपले दास करावें आणि त्यांस लिहावयास व वाचावयास शिकवावें आणि वार्जीनिया संस्थानांतील लोकसत्तात्मक राज्यामध्यें गरीब मुलांचे आणि पोष्यांचे पोषणाविषयीं जे नियम आहेत त्यांप्रमाणें जो धंदा चांगला दिसेल तोही त्यांस शिकवावा असें ठरविलें. "माझ्या पाठीमागें त्या दासांस स्वतंत्र करण्याची वेळ येई तोंपर्यंत त्यांच्यापैकीं एकास देखील स्वतंत्र करूं नये व त्यांस लोकसत्तात्मक राज्याच्या बाहेर पाठवूं नये" असें वाशिंगतनानें लिहून ठेविलें होतें. वाशिंगतनाच्या दासांमध्यें विल्यम ली ह्या नांवाचा एक दास होता त्यास त्यानें मरते वेळेस स्वतंत्र केलें आणि त्यास वर्षास तीस दालर द्यावे असें ठरविलें होतें. वाशिंगतनाच्या स्वभावांतील गुणदोषांचीं वर्णनें पुष्कळांनीं केलीं आहेत; परंतु त्याच्या बरोबरचा व कांहीं कांहीं गोष्टींत त्याचा प्रतिस्पर्धी जो तामस जेफर्सन नामें गृहस्थ होता त्यानें जें त्याच्या गुणदोषांचें वर्णन केलें आहे तें त्याचें अधिक आहे. जेफर्सन असें लिहितो कीं, "ज्या मंडळीमध्यें निःशंकपणानें संकोच सोडून कांहीं भाषण केलें असतां त्यापासून कांहीं भय नाहीं अशा मंडळीमध्यें वाशिंगतन बसला असतां जरी मन मोकळें करून हवें तितकें बोलत असे तरी तो बोलणारा फार चांगला नव्हता, तर मध्यम प्रतीचा होता. त्याच्या अंगीं विचारशक्ति मोठी नव्हती व वक्त्यासारिखें फार वेळपर्यंत पांडित्य करण्याचीही शक्ति नव्हती. दरबाराम

ध्यें कोणत्याही कामाविषयीं एकाएकी मत देण्याचा
प्रसंग आला असतां तो सिद्ध नसे. त्याचा अगदीं
घोटाळा होत असे तरी तो लिहिणारा मोठा वस्ताद होता.
त्याची लिहिण्याची भाषा चांगली, सुगम व शुद्ध असे.
लिहिण्याची रीति त्यानें लोकांशीं संभाषणें करून उच-
ळली होती. कारण त्यास वाचणें, लिहिणें व साधारण
हिशेब करणें एवढीच काय ती विद्या शिकविली होती.
आणि त्यानें मोठेपणीं सर्वेच्या कामाचा अभ्यास केला
व मुख्यत्वें करून तो आपला काल तें काम करण्यांत
घालवीत असे. थोडासा वेळ शेतकीच्या प्रकरणी ग्रं-
था व इंग्लदाचा इतिहास हे वाचण्यांत मात्र घालवीत
असे. शेतकी वगैरेच्या संबंधानें तो लोकांस पुष्कळ
पत्रें पाठवीत असे व त्याजकडेही पुष्कळ लोकांचीं
पत्रें येत असत. आणि घरगुती रिकामपणाचा वेळ
तो पत्र्या गोष्टी लिहिण्यांत बहुतकरून घालवीत
असे. सर्व गोष्टींचा विचार करून पाहिलें असतां
त्याचा स्वभाव उत्तम प्रकारचा होता. कोणत्याही गोष्टीं-
ची न्यूनता नव्हती. कांहीं कांहीं गोष्टींमध्यें तो उदासीन
मात्र होता. वाशिंगूतनास बुध्यादि गुण, शरीरसंपत्ति
आणि दैव हीं जशीं अनुकूल होतीं तशीं दुसऱ्या को-
णास नव्हतीं. यामुळें निरंतर स्मरण धरण्याजोगे जे
योग्ययोग्य पुरुष होऊन गेले त्यांच्या समाजामध्यें त्या-
ची गणना करणें हें आपणास योग्य आहे. कारण
आपला देश स्वतंत्र करण्याकरितां जी त्यानें मोठी
लढाई केली तिजमध्यें सैन्याची व्यवस्था मोठ्या चा-
तुर्यानें करून जय मिळविला. आणि आपल्या बुद्धिब-

[library stamp]

छापे.

लांच्या योगानें आपला देश स्वतंत्र करून तेथें नवें राज्य स्थापलें व आपल्या चातुर्याच्या योगानें त्याची सर्व व्यवस्था यथास्थित करून राज्य सुरळीत चालेसें केलें. त्यानें दिवाणी व फौजदारी कायदे आमरणांत शिरसावंद्य मानून त्यांचें कधींही उल्लंघन केलें नाहीं. याप्रमाणें कोणी पुरुष अद्यापपर्यंत झालेला आढळ-त नाहीं.

समाप्त.